रायगड, शनिवार दि. १६ डिसेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

गुलाबी थंडीने पर्यटकांना हुडहुडी

पान ३ वर

बच्चन कुटुंबात वादळ?

पान ८ वर

आजचा अग्रलेख
न्यायालयातील विनोद

वे|घ|क

अमली तस्करीचे धागेदोरे परदेशात

अलिबाग : खोपोली पोलिसांनी ढेकू गावाजवळ छापा टाकून अमली पदार्थाचा साठा जप्त केला होता.त्या कारवाईनंतर आणखी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तो परदेशात अंमली पदार्थ पाठविणारा कस्टम क्लिअरींग एजंट असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अमली पदार्थाच्या तस्करीचे धागेदोरे परदेशापर्यंत पोहचले असल्याचे उघड झाले आहे. ढेकू येथे बंद असलेल्या कारखान्यात अवैधरित्या अमली पदार्थ तयार करणाऱ्याचा कारखाना सुरु होता. सात डिसेंबरला छापा टाकून पोलिसांनी तिघांना अटक केली. त्यांना १४ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. त्यांच्या कोठडीत वाढ केली. अधिक तपासात •➤ पान २ वर

अतिप्रसंग करणाऱ्यास २० वर्षाची सक्तमजुरी

पनवेल : अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्या प्रकरणी आरोपी सचिन गुरव याला वीस वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा आणि ५ हजार रुपयांचा दंड सुनावण्यात आला आहे. सचिन मोहन गुरव याच्या विरुद्ध ११ वर्षाच्या व १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलींवर लैगिक अत्याचार केल्याचा आरोप होता. विशेष सत्र न्यायाधीश, ए. एस. राजदेरकर यांनी निकाल दिला. सदर खटल्यात विशेष शासकीय अभियोक्ता प्रतिक्षा वडे यांनी सरकारपक्षातर्फे न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद केला. सदर खटल्यात विशेष शासकीय अभियोक्ता प्रतिक्षा वडे, यांनी एकूण १३ साक्षीदार तपासून दमदार युक्तिवाद केला, त्यामध्ये फिर्यादी, दोन्ही पीडिता आणि तपास अधिकारी यांची साक्ष न्यायालयासमोर महत्वपूर्ण ठरली. तसेच पैरवी कर्मचारी म.पो.शि. प्रियंका नागावकर, पो. ह. सचिन खैरनार, यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

मागासवर्ग आयोगाची नागपुरात बैठक

नागपूर : राज्य मागासवर्गीय आयोगाची १९ डिसेंबरला नागपुरात बैठक होणार आहे. या बैठकीत महत्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. सर्वेसाठी सदस्यांच्या सूचनांनुसार केलेले निकष अंतिम करण्यात येणार आहेत. नियोजनानुसार आयोगाची बैठक २२ डिसेंबरला पुण्यात होणार होती. मात्र आयोगाच्या अध्यक्षांनी ३ दिवसआधीच बैठक बोलावली आहे. दरम्यान, आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे राज्यात दौरे घेत आहेत. आपले जे ठरले होते, त्याप्रमाणे काय झाले. हे १७ तारखेपर्यंत सांगा, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

गावाच्या विकासासाठीची जागा देण्यास आक्षेप

परहूर कारागृहाला विरोध

आ. जयंत पाटील यांनी विधान परिषदेत उठविला आवाज

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील परहूर येथील गट नं. १३२ या क्षेत्रावर शासकीय कारागृह बांधण्यासाठी एकतर्फी घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी विशेष उल्लेखाद्वारे केली. रायगड जिल्ह्यातील अन्य प्रश्नांवरही त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

परहूर येथील ६-३३-०० हे. आर. १०.३६ ही मिळकत परहूर ग्रामस्थांच्या ताब्यात होती. सामाजिक वनीकरण विभागाने ही जागा वृक्ष लागवडीसाठी ताब्यात घेतली होती. ही जमीन विकसित झाल्यावर ग्रामस्थांना सुपूर्द न करता, ग्रामपंचायतीकडे •➤ पान २ वर

मार्गदर्शक स्तंभ उभारा

अलिबाग तालुक्यातील वरसोली, चाळमळा येथे खाडीच्या मुखाजवळ मार्गदर्शक स्तंभाच्या उभारणीचे काम सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र अद्यापर्यंत काम सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे निधी शासनाकडे वर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्याचे काम तातडीने सुरु करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली.

बॅटरी चोरीप्रकरणी होणार पुन्हा चौकशी

मुरुडमधील राजपुरी येथे बुधवार २२ नोव्हेंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास विजयसागर नावाच्या यंत्रचलित बोटीतून बॅटऱ्या, तांबे, पितळ, लोखंड आदी साहित्यांची काहींनी चोरी केली. एका टेम्पोत भरून ते साहित्य भंगार व्यवसायिकाला दिल्याचे नयन तांबटकर यांच्या निदर्शनास आले. त्यांनी मुरुड पोलिसांशी संपर्क साधून •➤ पान २ वर

आरोग्याचा प्रश्न गंभीर

उरण तालुक्यात नागरिकीकरण झपाट्याने वाढत आहे. गावागावात कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. कचराभूमी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली, असा सवाल आ. जयंत पाटील यांनी उपस्थित केला. याबाबत मंत्री गिरीश महाजन यांनी •➤ पान २ वर

वासरंग येथील दळी जमिनीवर अतिक्रमण

- अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आ. जयंत पाटील यांची सभागृहात मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील वासरंग येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या दळी जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले आहे. अन्य व्यक्तींची सातबारा उताऱ्यावर नोंद करण्यात आली आहे. या बेकायदेशीर नोंदी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी सभागृहात केली.

वासरंग येथील जमीन दस्तुरी भागातील सर्व्हे नं. ४७ / अ / १ क्षेत्र २७०.०४ या क्षेत्रातून आदिवासी शेतकऱ्यांना दळी जमिनीचे वाटप करण्यात आले. दळी क्षेत्रातील उर्वरित इतर जमीन शेतकऱ्यांना मिळावी. तसेच या जमिनीमध्ये प्रकल्पासाठी संपादित केलेली जमीन रद्द करण्यात यावी अशी मागणी स्वरदानी आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्था पेण यांनी केली आहे.

याबाबत वारंवार पत्र व्यवहार करण्यात आले आहेत. मात्र शासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. या जमिनीमध्ये अतिक्रमण करण्यात आले आहे. वाटप केलेल्या जमिनीच्या क्षेत्रातील सातबारा उताऱ्यामध्ये आदिवासी शेतकऱ्यांव्यतिरिक्तअन्यशेतकऱ्यांच्या नावांची नोंद करण्यात आली आहे. प्रत्यक्षात शासनाकडून जमीन हस्तगत करताना आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. ही बाब आ. जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. या नोंदी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली.

सरकारच्या आश्वासनानंतर नैनाविरोधी उपोषण मागे

। पनवेल । वार्ताहर ।

नैना प्रकल्प विरोधात सुरु असलेले बेमुदत उपोषणामागे महाविकास आघाडी भक्कमपणे उभी राहिली. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांची बाजू मांडून सभागृहाचे लक्ष वेधून घेतले होते. सर्व आमदारांनी सभागृहात प्रश्न लावून धरल्यानंतर सत्ताधाऱ्यांकडून सभागृहातच आश्वासित करण्यात आल्यामुळे उपोषणकर्त्यांनी आपले बेमुदत उपोषण मागे घेतले.

यावेळी शिवसेना नेते अनंत गीते, उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय पाटील, नैना उपायुक्त सुकेशु पगारे, शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख बबन पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, नैना समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, नारायण घरत, काँग्रेसचे आर.सी.घरत, सुदाम पाटील, शिवसेना विधानसभा •➤ पान २ वर

ललितला सात दिवसांची कोठडी

नवी दिल्ली : संसदेच्या आवारात आणि लोकसभेच्या सभागृहात धूर पसरवत गोंधळ घालणाऱ्या चार आरोपींना पोलिसांनी अटक केली. हे आरोपी ज्या दाम्पत्याकडे राहिले होते त्यांनाही पोलिसांनी अटक केली. यानंतर या कटाचा मास्टरमाईंड ललित झा हा फरार होता. त्याने पोलिसांसमोर गुरुवारी उशिरा आत्मसमर्पण केले. त्यानंतर ललितला पटियाला हाऊस न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याने स्वतःच आपण या कटाचा सूत्रधार असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच या प्रकरणी •➤ पान २ वर

आमदार अपात्रता प्रकरण!

नार्वेकरांना दहा जानेवारीपर्यंत मुदत

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रता प्रकरणाच्या निकालाचं लेखन करण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्वोच्च न्यायालयात २१ जानेवारीपर्यंत वेळ वाढवून मागितला होता. पण, सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकरांना आमदार अपात्रता प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्यासाठी १० जानेवारीची मुदत दिली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांचं राजकीय भवितव्य आता १० जानेवारीला ठरणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे अनेक घडामोडी घडत आहेत. विधीमंडळाचं सध्या हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या हिवाळी अधिवेशनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल नवं भाकीत वर्तवलं आहे. तसेच काँग्रेस आमदार कैलास गोरंट्याल यांनीदेखील एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत मोठा दावा केला. दोन्ही आमदारांच्या दाव्यानुसार महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा मोठा भूकंप येण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी घेण्यासाठी •➤ पान २ वर

या प्रकरणानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु झाली आहे. एकनाथ शिंदे यांचं संपूर्ण भवितव्य या सुनावणीच्या निकालावर अवलंबून आहे. हा निकाल एकनाथ शिंदे यांच्या बाजूने लागला तर उद्धव ठाकरे यांचं मोठं नुकसान होणार आहे. पण हा निकाल उद्धव ठाकरे यांच्या बाजूने लागला तर शिंदे गटाचे नुकसान होऊन एकनाथ शिंदे यांचं मुख्यमंत्रीपद जाऊ शकतं. त्यामुळे येत्या १० जानेवारीला शिंदे गट भाजप आणि अजित पवार गटाच्या सरकारचे भवितव्य स्पष्ट होणार आहे.

एकरी १४ क्विंटलचा जुना नियम कायम करा

पंडित पाटील यांची मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये भात खरेदी केंद्र सुरु झाले आहेत. केंद्रात भात खरेदीसाठी लगबग सुरु झाली आहे. प्रति एकरी १४ क्विंटल धान देण्याऐवजी सरकारने १० क्विंटल देण्याचा नियम काढला आहे. मात्र सरकारने यंदा धान देण्याच्या नियमात बदल केल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे धान देण्याचा जुनाच नियम कायम करावा अशी मागणी माजी आ. पंडित पाटील यांनी केली आहे.

कोकणात विशेष करून रायगड जिल्ह्यात भाताबरोबरच आंब्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. यावर शेतकऱ्यांचे उत्पन्न अधिक आहे. शेतकऱ्यांची व्यापारी पिळवणूक करीत होते. कामगार मिळत नसल्याने शेती ओसाड पडण्याच्या मार्गावर होती. परंतु सरकारने हमी भाव देण्यास सुरुवात केल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे. त्यामुळे अनेकजण शेतीकडे वळू लागले आहेत.

रायगड जिल्ह्यात ३८ भात खरेदी केंद्र आहेत. आतापर्यंत आठ हजार ३२९ क्विंटल भात खरेदी झाले आहे. ६५० शेतकऱ्यांनी आपले भात केंद्रात दिले आहे. यंदा प्रति क्विंटल दोन हजार ८३ रुपये हमी भाव दिला जाणार आहे. गतवर्षीच्या तुलनेने हमी भावात १४३ रुपयांनी वाढ झाली आहे. परंतु यंदा १० क्विंटल प्रति एकरी भात देण्याचा नियम लागू केला आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होण्याची भीती माजी आ. पंडित पाटील यांनी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या बाजूने असल्याच्या जाहीरातबाजी करणारे सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करीत असल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे. सरकारने १४ क्विंटल एकरी धान देण्याचा निर्णय घ्यावा अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

मराठा आरक्षणासंदर्भात सोमवारी दिल्लीत बैठक

। पुणे । प्रतिनिधी ।

राज्यात गाजत असेल्या मराठा आरक्षण या विषयावर राज्यातील सर्व खासदारांनी एकमताने संसदेत आवाज उठवावा, यासाठी छत्रपती संभाजीराजे यांनी पुढाकार घेतला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात भूमिका निश्चित करण्यासाठी त्यांनी राज्यातील सर्व लोकसभा आणि राज्यसभा खासदारांची संयुक्त बैठक आयोजित केली आहे. ही बैठक सोमवारी (दि.१८) दिल्ली येथे होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि नारायण राणे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले आहे.

मराठा समाज आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून संघर्ष करत आहे. त्यासाठी मोर्चे, आंदोलन, उपोषणही सुरू आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला छत्रपती संभाजीराजे यांनीही पाठिंबा दर्शविला आहे. कायदेशीर प्रक्रियेची माहिती असल्याने त्यांनी हा पुढाकार घेतला असून काही दिवसांपूर्वी त्यांनी राज्यातील सर्व खासदारांना पत्र पाठविले होते.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकप्रतिनिधी या नात्याने आवाज उठविण्याचे आवाहन त्यांनी पत्राद्वारे केले होते. या पार्श्वभूमीवर सर्व खासदारांची दिल्ली येथे त्यांनी बैठकीचे आयोजन केले आहे. दिल्लीतील •➤ पान २ वर

शेकापची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

माथेरानला ई रिक्षा सुरू करा

माथेरान । प्रतिनिधी ।

सर्वोच्च न्यायालयाने माथेरानला ई रिक्षा सुरू करण्याचे आदेश देऊन तीन आठवडे झाले आहेत. तरीही ई रिक्षा सुरू करण्याबाबत माथेरान नगरपरिषद कोणताही निर्णय घेत नसल्याने शेतकरी कामगार पक्षाचे अध्यक्ष शफीक शेख व सचिव उमेश कदम यांनी 'ई रिक्षा' परवानाधारक हातरिक्षा चालकांना द्यावी. कोणत्याही परिस्थितीत ठेकेदार नेमला जाऊ नये. अशी मागणी केली आहे.

ई रिक्षाच्या मागणीसाठी सुनील शिंदे यांनी श्रमिक रिक्षा संघटनेकरीता सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर २२ नोव्हेंबर रोजी सुनावणी झाली. न्यायाधीश बी.आर. गवई, न्यायमूर्ती अरविंद कुमार व न्यायमूर्ती प्रशांत कुमार यांनी ई रिक्षाचा प्रकल्प सुरू ठेवण्याचे महत्वपूर्ण आदेश दिले. ई रिक्षा ह्या संपूर्ण माथेरान शहरात धावतील असा स्पष्ट आदेश दिला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते आमदार जयंत पाटील यांनी अनेकदा विधानपरिषदेत ई रिक्षासाठी राज्य •➤ पान २ वर

राज्यघटनेने प्रत्येकाला आपल्या व्यवसायात बदल करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. ई रिक्षा सुरू करण्याच्या निर्णयामुळे आमची अमानवीय प्रथेतून मुक्ती होईल व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळेल. बारा वर्षांच्या पाठपुराव्या नंतर पर्यटन क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज असलेला ई रिक्षा सारखा महत्वाकांक्षी प्रकल्प काही दिवसातच मार्गी लागणार आहे.ई रिक्षा आम्हीच चालवणार. त्यासाठी आम्ही आजपर्यंत अनेकवेळा संघर्ष केला आहे. तो काही ई रिक्षाची निविदा काढून ठेकेदाराला पोसण्यासाठी नाही.

– रुपेश गायकवाड, रिक्षा चालक

सोन्याच्या पेढीत चोरी करणारा एक अटकेत; एक फरार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील रमेश ज्वेलर्स या दुकानातून भरदिवसा दागिने चोरीला गेले होते. नेरळ पोलिसांनी तपासाची सूत्रे हलवून एका चोराला अटक केली असून एक चोर अद्याप फरार आहे.

डिकसळ येथे रमेश ज्वेलर्स या नावाचे दुकान या आहे. या दुकानाचे मालक हर्षवर्धन बिरगळ हे दुकानात असताना दुपारी सव्वा वाजता एक दुचाकी त्यांच्या दुकानासमोर येवून थांबली. त्या दुचाकीवर दोन व्यक्ती दुचाकीवरून उतरून दुकानात आल्या.

सोन्याची बाली पाहिजे अशी मागणी केल्यावर दोन ग्रॅम वजनाची सोन्याची बाली दुकानदाराने दाखवण्यासाठी डब्बा बाहेर काढला. डब्बाबाहेर काढताच त्या दोघांपैकी एकाने तो डब्बा खेचून घेतला. त्यावेळी बिरगळ यांनी त्या तरुणाचा शर्ट पकडून त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या दोन्ही अनोळखी तरुणांनी डब्बा हिसकावून घेत दुकान मालकाला ढकलून तेथून पळ काढला. ते पळून गेल्यानंतर या घटनेची आरडाओरड झाली. रमेश ज्वेलर्सचे मालक यांनी नेरळ पोलीस •➤ पान २ वर

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ डिसेंबर

१) श्री. प्रेमजी बालन डेडीया, अलिबाग, १६-१२-१९५०
२) श्री.काशिनाथ सखाराम वलसोलकर कोळीवाडा, अलिबाग, १६-१२-१९५२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

भिसे खिंडीत संरक्षण कठड्यांचा अभाव

सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठणे- रोहा राज्य मार्गावरील नागमोडी वळणे असलेल्या धोकादायक भिसे खिंडीत अनेक ठिकाणचे संरक्षण कठडे तुटल्यामुळे तसेच संरक्षण कठाड्याचे लोखंडी पाईप तुटल्यामुळे वाहनांना अपघात होऊन वाहने दरीत कोसळुन अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तुटलेले संरक्षण कठडे अपघाताला निमत्रंणच देत असल्याचे दिसून येत आहे. असे असतांना सार्वजनिक बांधकाम खाते यावर कोणतीही उपाययोजना करीत नसल्याने या मार्गावरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावी लागत आहे. प्रकाराबद्दल प्रवासीवर्गाकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

भिसे खिंडीमध्ये धोकादायक वळणावर असलेले अनेक ठिकाणचे संरक्षण कठड्यांचे लोखंडी पाईप, दगड-सिमेंटचे संरक्षण कठडे तुटल्यामुळे तसेच संरक्षण कठाड्यांच्या अभावामुळे वाहने खोल दरीत कोसळुन मोठा अपघात होण्याची भीती प्रवाशांमध्ये व वाहनचालकांमध्ये व्यक्त होत आहे.

अनेक ठिकाणच्या वळणावर वाहने दरीत कोसळून लहान-मोठे अपघात होण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. त्यामुळे भिसे खिंडीतिल दरीच्या बाजुला मजबूत लोखंडी रेंलिग व सिमेंटचे संरक्षण कठडे बांधणे, रात्री वाहनचालकांना मार्ग दिसण्याकरीता रेडियममध्ये फलक लावण्यात यावे अशी मागणी प्रवासीवर्ग व वाहनचालकांतुन होत आहे.

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या रोहा उपविभागाचे अभियंता एम.एन. घाडगे यांच्याशी संपर्क साधला असता लवकरच भिसे खिंडीतील संरक्षक कठडे बांधण्यात येतील असे त्यांनी सांगितले.

गुरव व विरशैव लिंगायत समाजाचे कार्यालय कार्यान्वित

। रायगड । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत गुरव समाजाच्या सर्वांगीण विकास व आर्थिक उन्नतीसाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ आणि विरशैव लिंगायत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची शासनाने स्थापना केली आहे.

गुरव व विरशैव लिंगायत समाजाच्या विकासासाठी रायगड येथे कार्यालय कार्यान्वित करण्यात आले असल्याचे शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांनी दिली आहे.

अधिक माहितीसाठी जिल्ह्यातील गुरव व विरशैव लिंगायत समाजातील नागरिकांनी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या., श्री राम समर्थ सहकारी गृह. संस्था मर्या., रुम नं. १०१, पहिला मजला, चेंढरे, हनुमान मंदिराच्या मागे, ता. अलिबाग, जि.रायगड, (संपर्कासाठी दुरध्वनी क्र. ०२१४१-२२४४४८) येथे संपर्क साधावा असे सांगण्यात आले आहे.

बॉम्बच्या अफवेने पळापळ; बॅगमध्ये निघाले कपडे

। पनवेल । वार्ताहर ।

बॉम्बच्या अफवेने पनवेल रेल्वे स्थानकात पळापळ सुरू झाली. बॅगची तपासणी केली असता त्यामध्ये कपडे निघाले. पनवेल शहर ,पनवेल रेल्वे पोलीस आणि बॉम्ब स्कॉड घटनास्थळी दाखल झाले होते.

पनवेल रेल्वे स्थानकांच्या आवारात एक बेवारस बॅग पडली असून त्यामध्ये काहीतरी असावा असा कॉल पोलिसांना आल्याने, पनवेल रेल्वे स्थानक परिसरात पळापळ सुरू झाली होती आणि काही वेळे साठी येथील परिसर बॉम्ब स्कॉडने घेरले होते. बॅग कोणाचे होती याबाबत काहीही माहिती मिळाली नाही किंवा बागेमध्ये कोणताही आयडेंटिटी किंवा असा दस्तऐवज मिळून आला नाही व ती कोणाची आहे हे देखील पोलिसांना समजले नाही. त्यानंतर ही बॅग चेक केली असता त्या बॅगेत कपडे असल्याचे समोर आल्याने पोलीस यंत्रणेने सुटकेचा निश्वास सोडला आहे. ही घटना रात्री ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. यावेळी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

पनवेल रेल्वे स्थनाकाच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ एक बेवारस बॅग ठेवण्यात आली आहे. असा कॉल पनवेल शहर पोलिसांना ८ वाजण्याच्या आसपास आला होता, या कॉलमुळे पोलीस यंत्रणेची पळापळ सुरू झाली. हा कॉल आल्या नंतर पनवेल रेल्वे पोलीस तसेच पनवेल शहर आणि बॉम्ब स्कॉडच्या पोलिसांनी घटनास्थळी पोचून बॅगचा ताबा घेत बॅग ची तपासणी केली असता बॅगमध्ये कपडे असल्याचे बॉम्ब स्कॉडला दिसून आले. त्यामुळे पोलीस यंत्रणेने सह परिसराने सुटकेचा निश्वास सोडला आहे. ही घटना कळल्या नंतर जवळपास अर्धा तास हा परिसर बॉम्बच्या अफवेने वेठीस धरला होता.

माथेरानमधील शाळांचे स्नेहसंमेलन

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर, प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर व सेंट झेवियर हायस्कूल अशा तिन्ही शाळांचे एकत्रित स्नेहसंमेलन बुध. दि.१३ रोजी आयोजित करण्यात आले होते.या स्नेहसंमेलनात सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांनी आपल्यातील सांसकृतिक कला गुणांचे दर्शन घडवून उपस्थितांची दाद मिळवली. या कार्यक्रमात कोळीगीत, लोकगीत, गोंधळ, सामाजिक विषयी नाटिका,गायन तसेच लहानग्यांनी बहारदार नृत्याद्वारे अनेक कलाविष्कार सादर करून या सुंदर कार्यक्रमात रंगत आणली.या संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक सचिन भोईर, दिलीप आहिरे, लक्ष्मण ढेबे, संतोष चाटसे, सचिन रांजणे, संघपाल वाटोरे, अनिस पाटिल, अभिनय कळंबे, रमेश ढोले, विदुला गोसावी यांनी विशेष परिश्रम घेतले होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर शाळेचे विश्वस्त शशीभूषण गव्हाणकर, माथेरान नगरपालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे, पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, सेंट झेवियर शाळेच्या मुख्याध्यापिका सिसेलिया परेरा आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.तसेच मुलांच्या कलागुणांना दाद देण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पालकवर्ग व माथेरानमधील नागरिक देखील मोठया संख्येने उपस्थित होते.

वीर ते पनवेल लोकल ट्रेनची मागणी

। कोलाड । वार्ताहर ।

कोकण रेल्वे कोलाडपासून सुरु झाली. परंतु याच कोलाड रेल्वे स्टेशनला रत्नागिरी पॅसेंजर शिवाय कोणतेही ट्रेन थांबत नसल्याने वीर ते पनवेल लोकल ट्रेन सुरु करण्याची मागणी जनतेकडून केली जात आहे. दिवसेंदिवस कोकणचा विकास होत असून हा कोकण रेल्वेचा रोहा ते दिवा मार्ग फक्त ६६ किलोमीटर आहे येथे पोहचण्यासाठी ५३ मिनिटे लागतात. जिल्ह्यातील रोहा, तळा, माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन या सहा तालुक्यातील मुंबई-ठाण्याकडे नोकरीनिमित्त जाणारी लोकांची संख्या ही जास्त आहे. यामुळे वीर ते पनवेल लोकल ट्रेन सुरु झाल्यास मुंबई व उपनगरावरील ताण कमी होईल.

तसेच परिसरातील व्यावसाय वाढेल. याशिवाय मुंबई-ठाण्याकडे जाणाऱ्या जनतेची गैरसोय ही दुर होईल. यामुळे पनवेल ते वीर लोकल रेल्वे गाडी सुरु करावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

पोलादपूरात अग्निशमन यंत्रणेची गरज

। पोलादपूर । वार्ताहर ।

तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यालगत आंबेनळी घाटातील चिरेखिंड येथे रस्त्यालगतच्या गुरांच्या गवताच्या गोठयाला मंगळवारी सायंकाळी लागलेली आग ग्रामस्थांनी आटोक्यात आणली. यावेळी महाड एमआयडीसीचा अग्निशमन बंब पाचारण करण्यात आला असता आग नियंत्रणात आल्यानंतर तो घटनास्थळी पोहोचल्याने पोलादपूर तालुक्यात अग्निशमन यंत्रणेची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.

तालुक्यात आग लागण्याच्या अनेक घटनांमध्ये प्रामुख्याने उन्हामुळे गवताने पेट घेणे अथवा वणव्यामुळे आग लागण्याच्या प्रकारांचा समावेश असून क्वचितच गॅस सिलींडर अथवा शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याचे प्रकार घडले आहेत. पोलादपूर शहरामध्ये ३२ गॅससिलींडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीनंतर फटाक्याच्या दुकानामुळे लागलेल्या आगीच्या भीषण घटनांचा समावेश आहे. अनेकदा कोळसानिर्मितीसाठी वणवे लावण्याच्या घटनांमुळे आग फैलावत असल्याचे दिसून आले आहे. कशेडी घाटामध्ये ज्वालाग्रही रसायनांच्या वाहतुकीमुळे तसेच वाहनांमध्ये शॉर्ट सर्कीट झाल्याने लागलेल्या आगीच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी महाड नगरपरिषद, महाड एमआयडीसी, खेड नगरपरिषद अथवा खेड लोटे एम आयडीसी येथील अग्निशमन बंबांना पाचारण करण्यात आले आहे. तब्बल तासभर उशिराने पोहोचलेल्या महाड एमआयडीसीच्या अग्निशमन बंबातून पाण्याचा फवारा मारून आग पूर्णत: विझविण्यात अग्निशमन यंत्रणेला यश आले. मात्र, या घटनेमुळे देखील पोलादपूर तालुक्यासाठी अग्निशमन यंत्रणेची गरज निर्माण झाली आहे.

कळंबोलीत राष्ट्रवादीचा कार्यकर्ता मेळावा

खा. शरद पवारांची प्रमुख उपस्थिती

। पनवेल । वार्ताहर ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवारांनी बंड केल्यानंतर राज्यातील राजकारण पूर्ण ढवळून निघाले. परंतु पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना मानणारे आजही लाखो कार्यकर्ते पक्षांमध्ये सक्रिय आहेत. या राजकीय उलथा पालथी नंतर नवी मुंबई कळंबोली येथे प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत कळंबोलीतील श्रीमती शामल मोहन पाटील विद्यालयाच्या भव्य प्रांगणात स्वाभिमानी कार्यकर्त्यांचा मेळावा शनिवारी १६ डिसेंबर रोजी आयोजित केला आहे. या मेळाव्यात प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील, खा. डॉ. अमोल कोल्हे, महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे आदींसह राज्यातील शरद पवारांवर निस्सिम प्रेम करणारे कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. याबाबतची माहिती पनवेल जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील यांनी कळंबोली येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली. या पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, प्रदेश समिती सदस्य सुरदास गोवारी, दौलत शिंदे, प्रमोद बागल, ॲड. तुषार पाटील, पनवेल जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद यादव, उपस्थित होते.

राणेची वाडीत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प

। तळा । वार्ताहर ।

तळा नगरपंचायती मार्फत राबविण्यात येत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम सध्या प्रगती पथावर आहे. येत्या दोन ते तीन महिन्यात कचऱ्यावर प्रक्रिया करणारी मशिनरी दाखल होताच हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे आता लवकरच तळा शहरात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प साकार होणार असल्याची माहिती उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी दिली आहे.

तळा हे विकसित शहर आहे त्यामुळे शहराच्या गरजा देखील वाढत आहेत. या शहरातून दिवसाला एक ते दीड टन कचरा जमा होत आहे तीन घंटा गाड्यांच्या साहाय्याने २२ कर्मचारी हा कचरा दररोज जमा करतात आणि तो सध्या प्रकल्प ठिकाणी संकलित केला जात आहे. तळा नगरपंचायतीच्या वतीने जमा होणारा कचरा तहसील रस्त्या लगत वडाची वाडी येथे असणाऱ्या धरणाच्या बाजूला टाकला जातो.

नगरपंचायतीचे आता राणेचीवाडी येथे स्वमालकीची जागा आहे आता हा जमा होणारा कचरा या नवीन प्रकल्पस्थळी टाकला जाणार आहे.याच वर्षी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार होत असून येत्या तीन ते चार महिन्यात आवश्यक असणाऱ्या मशिनरी दाखल होताच हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे.

या प्रकल्पस्थळी कचऱ्याचे विलगिकरण करून ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत बनविण्यात येणार असल्याची माहिती उपलब्ध होत आहे. तर सुक्या कचऱ्यावर देखील मशीन उपलब्ध झाल्यावर हा प्रकल्प सुरू होऊन त्यावर देखील प्रक्रिया होणार आहे. या कामासाठी अंदाजे २९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून काम जसजसे पूर्णत्वास जाईल त्याप्रमाणे अधिकचा निधी उपलब्ध होणार असल्याचे समजते. धरणाच्या बाजूला शहराचा संपूर्ण कचरा गेली अनेक वर्षे टाकला जात आहे पिण्याच्या पाण्याच्या बाजूलाच कचरा संकलित करण्यात येत असल्याने टीकांचा भडिमार तळा नगरंचायत आणि लोकप्रतनिधी यांच्यावर होत असताना राणेचीवडी येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प साकारणार असल्याने तळा शहर वासियांनी समाधान व्यक्त केले आहे.

श्रीवर्धनमध्ये दिव्यांग तपासणी शिबीर

श्रीवर्धन : सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील दिव्यांग तपासणी शिबीर श्रीवर्धन न. प. शाळा क्रमांक १ येथे दि.१६ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. तरी दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

पान १ वरून

परहूर कारागृहाला विरोध

वर्ग करण्यात आली. मात्र ग्रामपंचायतीने ग्रामस्थांना विश्वासात न घेता ही जागा जिल्हा कारागृहासाठी देण्याचा निर्णय घेतला. ही जागा गावाच्या विस्ताराकरीता राखीव आहे. या जाग्यावर कारागृह उभारले तर ग्रामस्थांना नवीन इमारत, घरे बांधण्यास व इतर विकासकामे करण्यास अडचणी येऊ शकतात. ही बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून कारागृह बांधण्यासाठी घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी केली.

बॅटरी चोरीप्रकरणी होणार पुन्हा चौकशी

माहिती दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन टेम्पो ताब्यात घेतले. मात्र चोरी करणाऱ्या चौघांविरोधात पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. बॅटरी चोरी प्रकरणाबाबत पोलिसांनी जुजबी कारवाई करून याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली आहे. सभागृह उपसभापतींनी त्यांच्या मागणीला दुजोरा दिला आहे. त्यामुळे या प्रकरणाची पुन्हा चौकशी होण्याची शक्यता आहे.

आरोग्याचा प्रश्न गंभीर

उरणमध्ये कचरा विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याची कबुली देत सिडको आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे जागेसाठी मागणी करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

मास्टरमाईंड ललित झा याला सात दिवसांची पोलीस कोठडी

आता त्याची कसून चौकशी केली जाणार असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दिल्ली पोलिसांनी न्यायालयाकडे ललित झा याला पंधरा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली जावी अशी मागणी केली होती. मात्र त्याला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. न्यायमूर्ती डॉ. हरदीप पुरी यांनी आरोपी ललित झा याला विचारलं की तुझ्याकडे वकील आहे का? त्यावर त्याने नाही असे उत्तर दिले. संसदेत गदारोळ घालून धूर पसरवणारे सागर शर्मा, मनोरंजन डी, नीलम आजाद आणि अमोल शिंदे यांनाही सात दिवसांची पोलीस कोठडी गुरुवारी सुनावण्यात आली.

सरकारच्या आश्वासनानंतर नैना विरोधी उपोषण मागे

समन्वयक प्रदीप ठाकूर, दीपक घरत, योगेश तांडेल, कॉम्रेड भूषण पाटील, प्रशांत पाटील, युवासेनेचे पराग मोहिते, शहर प्रमुख यतीन देशमुख, काशिनाथ पाटील, हेमराज म्हात्रे, अतुल म्हात्रे उपस्थित होते.माजी आमदार बाळाराम पाटील यांनी बोलताना सांगितले की, नैना विरोधी संघर्ष करीत असताना आम्ही नेहमीच मोठमोठी आंदोलने करीत आलो आहोत. मात्र अनिल ढवळे यांनी सातत्याने नैनाच्या विरोधात आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आणि ते यशस्वी देखील झाले. आणि त्यांच्या प्रत्येक आंदोलनात महिलांचा सहभाग हा त्यांच्या आंदोलनाच्या यशाचे मुख्य कारण बनले आहे. त्यामुळेच यापुढे महिलांनी आपल्या हक्कासाठी असेच पुढे राहिले पाहिजे आणि संघर्ष केला पाहिजे. नैना हटविण्याच्या मुख्य लढ्यात यापुढे शासनाला आपल्यापुढे नमविण्यासाठी आपण वज्रमूठ तयार केली आहे.असे बाळाराम पाटील म्हणाले .

ज्यापद्धतीने विधिमंडळात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सभागृह गाजविले आणि नैना प्रकल्पग्रस्त उपोषणकर्त्यांच्या भावनांची कदर केली आहे. त्यामुळे मंत्र्यांना सभागृहात आश्वासन देण्याची वेळ आली. या अर्थी आपले हे उपोषण नक्कीच यशस्वी झाले आहे. येणाऱ्या काळात सरकारने नियोजित बैठकीमध्ये जर दिरंगाई केली तर मात्र सरकारला गराडा घालण्यासाठी आपल्याला सज्ज व्हावे लागेल, यासाठी आपल्याला तयारी करण्याची गरज आहे. यावेळी उपोषणकर्ते अनिल ढवळे यांनी देखील ९५ गावातील नागरिक हे न्याय न मिळाल्यास ९५ दिवस रस्त्यावर उतरून यशवंतराव चव्हाण मुंबई - पुणे द्रुतगती महामार्ग रोखण्यासाठी तयार असल्याचा इशारा देखील बाळाराम पाटील यांनी राज्य शासनाला दिला.

यावेळी अनंत गीते यांनी शेतकऱ्यांची चेष्टा करणाऱ्या लोकप्रतिनिधींचा निषेध व्यक्त करीत शेतकऱ्यांच्या आंदोलनात वापरण्यात आलेल्या शिर्षकामध्ये बदल करताना राज्य सरकारने कितीही हात काढून घेण्याचा प्रयत्न केला तरी आता हे शक्य नाही, म्हणून आता शेतकऱ्यांची विजययात्रा ही राहणार आहे. मात्र यापुढे नैनाची अंत्ययात्रा निघेल, असा विश्वास व्यक्त केला.

माथेरानला ई रिक्षा सुरू करा

सरकारचे लक्ष वेधले आहे. सध्या चालू अधिवेशनात देखील ई रिक्षा का सुरू करत नाही हा प्रश्न सुध्दा ते उपस्थित करणार आहेत.

१२ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान राज्य सरकारचे वकील राहुल चिटणीस यांनी न्यायालयाला ग्वाही दिली आहे की, माथेरानच्या परवानाधारक हात रिक्षा चालकांना ई रिक्षाची परवानगी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तत्पूर्वी कोणत्या प्रकारची ई रिक्षा धावू शकते याची चाचपणी करण्यासाठी तीन महिन्यांच्या पायलट प्रकल्पाची मान्यता दिली. प्रकल्पाचा अहवाल सादर करून ई रिक्षा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

अश्वपाल संघटनेने ई रिक्षा व क्ले पेव्हर ब्लॉक्स विरोधात हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. २४ फेब्रुवारी रोजी सुनावणी दरम्यान ई रिक्षा विरोधातील मागणी न्यायालयाने फेटाळली व क्ले पेव्हर ब्लॉक्सच्या कामाला स्थगिती दिली. त्यामुळे अश्वपालकाना ई रिक्षा विरोधातील त्यांचे मत व्यक्त करण्याची सर्वोच्च न्यायालयाने पूर्ण संधी दिली आहे.

नार्वेकरांना दहा जानेवारीपर्यंत मुदत

३१ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली होती. त्यानुसार राहुल नार्वेकर सुनावणी घेत होते. या प्रकरणी दोन्ही बाजूने जवळपास युक्तिवाद पूर्ण झाला आहे.आता सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. असं असताना राहुल नार्वेकर यांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात धाव घेत तीन आठवड्यांची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी केली. शिवसेना आमदार अपात्रतेच्या प्रकरणाचा निकाल २० डिसेंबरला राखून ठेवला जाईल. पण मला २ लाखांपेक्षा जास्त कागदपत्रे आले आहेत. ते वाचावे लागतील. तसेच जजमेंट लिहावं लागेल. यासाठी तीन आठवड्यांचा वेळ वाढवून द्या, असं विधानसभा अध्यक्षांनी आपल्या अर्जात म्हटलं होतं. सर्वोच्च न्यायालयाने त्यांची ही मागणी काही अंशी मान्य केली. न्यायालयाने तीन आठवड्यांची वेळ वाढवून दिली नाही. पण १० दिवसांचीमुदतवाढ नक्कीच दिली. त्यामुळे राहुल नार्वेकर यांना काही अंशी दिलासा मिळाला आहे.

सोन्याच्या पेढीत चोरी करणारा एक अटकेत; एक फरार

ठाणे येथे फोन करून घडलेल्या घटनेची माहिती दिली.

नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी डिकसळ येथील रमेश ज्वेलर्समध्ये पोहचून घटनास्थळाची पाहणी केली. कर्जत नेरळ, कर्जत, मुरबाड आणि चिंचवली कडाव या रस्त्यावर नाकाबंदी करून तपास सुरू केला. खबऱ्यांच्या माध्यमातून पोलीस त्या अनोळखी चोरापर्यंत पोहचले आणि रमेश ज्वेलर्समधून एक लाख वीस हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या बाल्या चोरणाऱ्या एकाला ताब्यात घेतले. त्या तरुणाने गुन्हा कबूल केला असून नेरळ पोलिसांकडून दुचाकी चालवणाऱ्या तरुणाचा शोध सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला कर्जत न्यायालयात हजर केले असता त्याला १८ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

मराठा आरक्षणासंदर्भात सोमवारी दिल्लीत बैठक

महाराष्ट्र सदन येथे ही बैठक होणार असून या बैठकीस शरद पवार, नितीन गडकरी, नारायण राणे, रामदास आठवले, सुप्रिया सुळे यांनाही निमंत्रण देण्यात आले आहे. त्यामुळे खासदार या बैठकीला उपस्थित राहणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

अमली पदार्थ तस्करीचे धागेदोरे परदेशात

या गुन्ह्यात एका एजंटचा समावेश असून तो मुलंड येथे राहत आहे. देवराज गडकर असे त्याचे नाव आहे. तो परदेशात अमली पदार्थांची तस्करी करीत असल्याचे उघड झाले. न्यायालयाने त्याला १९ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

क्षणचित्र

अनोळखी इसमाचा मृतदेह

पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाणे परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध पोलीस करीत आहेत. सदर अनोळखी इसमाचे अंदाजे ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, डोक्याचे केस काळे वाढलेले, अगात गुलाबी रंगाचा शर्ट व निळसर रंगाची फुल पॅन्ट घातलेली असून चॉकलेटी रंगाची अंडरवेअर, कमरेला काळ्या रंगाचा करदोडा, उजवी हातामध्ये केशरी रंगाचा दोरा आहे. या इसमाबाबत माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

मतदार नोंदणी शिबीर

पनवेल : कळंबोली सेक्टर ४ येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त व बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त आधार कार्ड व नवीन मतदार नोंदणीचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास प्रचंड प्रतिसाद लाभला असून, विभागातील अनेक नागरिकांनी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी केली होती. या शिबिरास भाजपाचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, अमर पाटील, जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष आंधळे आदी उपस्थित होते.

शहरात श्वानांची दहशत

उरण : शहरातील अनेक रस्त्यांवर दहा, बाराच्या संख्येने घोळका करून भटके श्वान नागरिक आणि लहान मुलांवर हल्ले करू लागले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा भटक्या श्वानांची दहशत वाढू लागली आहे. अशीच स्थिती अनेक गावांतही असून, तालुक्यातील भटक्या श्वानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा भटक्या श्वानांची संख्या वाढल्याने निर्बीजीकरणाची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. उरण परिसरात शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात भटक्या श्वानांची संख्या वाढली आहे.

भेसळ करणारी टोळी गजाआड

नवी मुंबई : कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात एका गोडाऊनमध्ये नामांकित खाद्य तेलात भेसळ करून विकणाऱ्या टोळीला नवी मुंबई गुन्हे शाखेने उद्ध्वस्त केले. सदर ठिकाणी छापा टाकून तब्बल एक कोटी ७ लाख ५० हजार १०७ रुपयांचे भेसळयुक्त खाद्य तेल जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी ११ पेक्षा अधिक लोकांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. विशाल गाला, सुशाल नागडा, निलेश राजगोर, सोहम शिंदे, दिनेश जोषी, विनोल गुप्ता, मदन हा, तसेच अन्य काही कामगार अशी आरोपींची नावे आहेत.

दत्त परिक्रमेचे आयोजन

चौल : तालुक्यात चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त महाराजांच्या डोंगराला गुरुवार, दि. २१ डिसेंबर रोजी परिक्रमेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी तीन वाजता या परिक्रमेला प्रारंभ होईल, अशी माहिती वार्डे गुरुजी दत्त आरती मंडळाकडून देण्यात आली आहे. दत्त मंदिरात परिक्रमेला प्रारंभ होईल. या परिक्रमेचा मार्ग- स्वामी समर्थ मंदिर, सराई मार्गे दत्त मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारामार्गे पायरीने पुन्हा दत्त मंदिर असा असणार आहे. परिक्रमा यशस्वी होण्यासाठी आयोजक मेहनत घेत आहेत.

आंबेत पुलाच्या दुरवस्थेबाबत आ. जयंत पाटील आक्रमक

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीबाबत शेकापचे नेते आ. जयंत पाटील सभागृहात आक्रमक झाले. त्यांनी या पुलाच्या दुरुस्तीबरोबरच पुलाच्या जवळ सुरु असलेल्या अवैध वाळू उत्खननाबाबत सवाल उपस्थित केला. यावेळी बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की, पुलाच्या दुरुस्तीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मोफत फेरी बोट उपलब्ध करून दिली आहे. पुलाच्या खाली सुरु असलेल्या अवैध वाळू उत्खननावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

सावित्री खाडीवर १२ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या पुलाची दुरुस्ती करण्यासाठी १६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा पूल धोकादायक असल्याने वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. शाळकरी विद्यार्थ्यांसह आंबेत, म्हाप्रळ, मंडणगड, दापोलीकर नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे फेरी बोटीतूनच येजा करावी लागत आहे.

खाडीत वाळू उत्खनन होत आहे. त्यामुळे पुलाला तडे गेल्याने मोठा धोका निर्माण झाला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनदेखील या पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत आणि अवैध रेती उत्खननाबाबत शासनाने काय कार्यवाही केली, असा सवाल आ. जयंत पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला.

या प्रश्नाला उत्तर देताना बांधकाममंत्री चव्हाण म्हणाले, पुलाचा खांब जीर्ण झाल्याचे निदर्शनास आल्यावर १६.७६ कोटी रुपयांची कामे पूर्ण करून २० ऑक्टोबर रोजी पुलावरून वाहतूक सुरु केली आहे. काम चालू असताना स्थानिकांची गैरसोय होऊ नये यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विनाशुल्क फेरी बोट सेवा उपलब्ध केली आहे. पुलापासून पाचशे मीटर अंतरापर्यंत वाळू उत्खनन न करण्याबाबत संबंधित विभागाला सूचना केली आहे. या पुलाच्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. या पुलावरून २० टनापर्यंतच्या वाहतुकीला परवानगी दिल्याची माहिती त्यांनी दिली.

पेडली पुलाची होणार पुनर्बांधणी

■ आ. जयंत पाटील यांच्या मागणीची दखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील पेडली येथील पूल जीर्ण झाल्याची कबुली देत त्याची पुनर्बांधणी केली जाणार आहे. त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. शेकाप नेते आ. जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत हा मुद्दा उपस्थित केला.

१९८९ च्या महापुरानंतर पेडली येथे पूल बांधण्यात आला होता. आसरे, नवघर, कासारवाडी, धोंडीवली, कोडगांव, ठाणाळे, पुरातन वीरेश्वर मंदिर, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थीदेखील या पुलावरून येजा करतात. मात्र, याची दुरुस्ती न केल्याने या पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.संरक्षक कठडे तुटले आहेत. त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पूल कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पुलाच्या बांधणीला विलंब का होत आहे, असा सवाल आ. जयंत पाटील यांनी सभागृहाला विचारत, तात्काळ हा पूल नव्याने बांधण्यात यावा, अशी मागणी केली. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी म्हणाले की, हा पूल जिल्हा परिषदेच्या अखत्यारित आहे. तो क्षतिग्रस्त झाला आहे, असे त्यांनी कबूल केले. पुढे त्यांनी सांगितले. या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम केले जाणार आहे. प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. निधी वितरीत करण्यात आला आहे, त्याचे काम लवकरच होईल, अशी ग्वाही चव्हाण यांनी दिली.

विधानपरिषदेमध्ये झालेल्या चर्चेत बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले.

डाक विभागाचा सामान्यांना 'आधार'

। सारळ । वार्ताहर ।

कमीत कमी ५० च्यावर आधार दुरुस्ती असतील तर आधार अपडेट आपल्या गावात आपल्या दारात करुन देण्याचा मानस अधीक्षक डाकघर रायगड विभागाने व्यक्त केला आहे. डाक विभागाच्या उपक्रमामुळे सर्वसामान्याना आधारातील दुरुस्ती आता घरबसल्या करुन मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकासाठी आधार कार्ड महत्त्वाचे असून, आता अद्ययावत असणे ही काळाची गरज आहे. थोडक्यात आधार कार्डवर जुना मोबाईल नंबर असणे, फोटो जुना असणे, संपूर्ण जन्मतारीख नसणे, हाताचे ठसे अद्ययावत नसणे, अशी स्थिती सर्वसामान्य लोकांची आहे. मात्र, जोपर्यंत ही गोष्ट त्या व्यक्तीच्या लक्षात येत नाही किंवा त्याचे महत्त्व त्यांना समजत नाही, तोपर्यंत त्या व्यक्ती याबाबत अनभिज्ञ राहतात. त्यामुळे कामाव्यतिरिक्त असणारे अनेक ग्रामस्थ आधार अपडेटविना राहात आहेत. ही सेवा डाक विभागाच्या इतर सेवेबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून पोस्ट ऑफिसमधून पुरवली जात आहे.

आधारमधील बदल गावात करुन देण्याचा मानस

लहानमुलांचे आधार ५ वर्ष १५ वर्ष वयात अपडेट केलेच पाहिजे याची माहिती अनेक पालकांना नाही. जनतेत जनजागृती करण्यासोबत कमीत कमी ५० आधार अद्ययावत होऊ शकतील अशा ठिकाणी आधार शिबीर देण्याची शिफारस केली जाईल.

– सुनील थळकर, अधीक्षक डाकघर रायगड

२२ डिसेंबरला डाक अदालत

। सारळ । वार्ताहर ।

डाक विभागाच्या ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी रायगड डाक विभागाकडून दि. २२ डिसेंबर रोजी जिल्हा अधीक्षक रायगड डाक विभाग यांच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ग्राहकांच्या समस्या वेगवान व प्रभावी रीतीने विनाविलंब सोडवणे हा या अदालतीमागचा उद्देश असल्याचे डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी सांगितले.

या डाक अदालतीमधून डाक विभागाच्या ग्राहकांच्या असणाऱ्या समस्यावर, तक्रारीवर जागेवरच निर्णय घेऊन तोडगा काढण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. यामध्ये स्पीड, रजिस्टर, पार्सल या तक्रारीचे सहा आठवड्यांपेक्षा जास्त दिवस असलेल्या प्रलंबित तक्रारीचे निवारण केले जाणार आहे.

शेतीचे अधिकाऱ्यांकडून कौतुक

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुका शेतीप्रधान तालुका समजला जातो. गेल्या काही वर्षात परंपरागत शेतीची परंपरा नव्या पिढीने हाती घेतली आहे. येथील शेतकरी मोठ्या संख्येने प्रयोगशील शेतीकडे वळलेला दिसून येत आहे. या प्रयोगशील शेतीची पाहणी वरिष्ठ कृषी अधिकाऱ्यांनी करुन शेतकऱ्यांचे कौतुक केले.

कृषी विभागाच्या ठाणे कार्यालयातील अधीक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी संचालक बालाजी ताटे तसेच उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर यांनी कर्जत तालुक्यातील प्रयोगशील शेती उपक्रमांची पाहणी केली. त्यामध्ये तालुक्यातील शेती उत्पादनावर प्रक्रिया करून बनविल्या जाणाऱ्या पदार्थांचा उद्योग सुरु करणाऱ्या नेरळ येथील प्रवीण फूड्सची पाहणी करून तेथील उत्पादने आणि पॅकेजिंगची माहिती घेतली.

निकोप येथील अस्तरीकरण शेततळ्याची पाहणी कृषी अधीक्षकांनी केली. त्यावेळी स्थानिक शेतकरी रवींद्र झांजे, मधुकर झांजे, दूदा झंजे यांच्या शेती प्रकल्पांची पाहणी केली.

त्यात शेततळे, पावर टिलर आणि आंबा लागवड यांची पाहणी केली. तर, नेरळ-कळंब रस्त्यावरील बिरदोले येथील शेतकरी परशुराम कालेकर यांनी बनविलेल्या पोल्ट्री फीड यंत्राची पाहणी आणि उत्पादित मालाची पाहणी करण्यात आली. भिवपुरी स्थानकाजवळील वावे येथील मनीषा गुंडे यांनी केंद्र सरकारच्या योजनांतून बनविलेल्या अस्तरीकरण शेततळे यांची पाहणी करण्यात आली.

याप्रसंगी बालाजी ताटे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिवाजी फुलसुंदर यांच्यासह कर्जत तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी कर्जत दिनेश कोळी, कृषी पर्यवेक्षक सचिन केणे, किरण गंगावणे, सुदर्शन वायसे, कृषी सहायक विजय गंगावणे, अनिल रुपनवर, पंकज सोनकांबळे आणि लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

शाळेच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करणार : पुलेकर

। कोलई । वार्ताहर ।

'बेटी बचाव, बेटी पढाव' ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून मुरूड जंजिरा नगर परिषद हद्दीतील तक्कावाडी आदिवासीपाडा येथील प्राथमिक शाळेतील शैक्षणिक गरजा पुरविण्याचे आश्वासन सामाजिक कार्यकर्ते अनिल पुलेकर दिले. त्याचबरोबर एका मुलीची ती शिकेल तेवढ्या शिक्षणाची जबाबदारी यांनी स्वीकारली असून, जीवनात शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे म्हटले आहे.

तक्का आदिवासीवाडी प्राथमिक शाळेतील मानवी महेश वाघमारे दुसरी इयत्तेत शिकत असून, खूप हुशार विद्यार्थिनी आहे. मला खूप शिकायचे असून, भविष्यात पोलीस अधिकारी किंवा मोठा अधिकारी व्हायचेय, असा मानस तिने व्यक्त केला. मानवीच्या शिक्षणाची इच्छा पूर्ण करण्यासाठी शाळेतील शिक्षिका माधुरी राजे, वर्गमैत्रीण सुरेखा कर्णिक, मित्र मधुकर पानवलकर व तिचे आईवडील, काका रवींद्र वाघमारे यांच्या उपस्थितीत अनिल पुलेकर यांनी जबाबदारी स्वीकारली. तसेच त्याचबरोबर शाळेतील मुलांना आवश्यक त्या शैक्षणिक गरजा पुरविण्याचे आश्वासनही दिले.

निर्बीजीकरणासाठी भटक्या कुत्र्यांची धरपकड

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांना या भटक्या आणि मोकाट कुत्र्यांकडून दंश केला जाण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन कर्जत नगरपरिषदेने भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्याच्या उपक्रमाला सुरुवात केली आहे.पालिकेच्या या मोहिमेत पहिल्या दिवशी तब्बल २६ कुत्र्यांना पकडण्यात भरारी पथकाला यश आले.

कर्जत शहरातील अनेक भागात भटक्या आणि मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट दिसून येत होता. त्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील नागरिकांनी कर्जत नगरपरिषदेला तक्रारी केल्या होत्या. शहरात काही ठिकाणी

एकावेळी किमान १५-२० कुत्र्यांचे कळप दिसून येऊ लागल्याने शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना बाहेर एकटे सोडायला पालक घाबरु लागले. त्यामुळे पालिकेवर दबाव वाढू लागल्याने आरोग्य विभागाने भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचा प्रस्ताव तात्काळ मंजूर करून नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल आणि मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मान्यतेने भटके कुत्रे आणि मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे तात्काळ निर्बीजीकरण करण्याच्या उपक्रमाला मान्यता देण्यात आली. पालिकेचे त्यासाठी आपल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी एक कक्ष निर्माण करून घेतला. त्याचवेळी शहराच्या विविध भागात भटके आणि मोकाट कुत्रे पकडण्यासाठी निविदा काढून प्रामुख्याने कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे उद्दिष्ट नक्की केले.

कर्जत नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने काढलेल्या निवेदेला प्रतिसाद देऊन आलेल्या रिगल कंपनीच्या कामगारांनी कामाचे कार्यादेश मिळाल्यानंतर संध्याकाळी मोकाट कुत्र्यांना

कर्जत नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम

पकडण्याची कार्यवाही सुरु केली. पहिल्या दिवशी कर्जत शहरातील मुख्य बाजारपेठ भागात या पथकाने तब्बल २६ कुत्रे पकडले. त्यासाठी सहा तरुणांचे पथक जाळी घेऊन मोकाट कुत्रा बाजारात दिसताच कार्यवाही केली. शहरात बाजारपेठ भागात ही कारवाई करताना भटक्या कुत्र्यांना पकडून टेम्पोत भरण्यात येत होते. उद्यापासून शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांना पकडण्याची कार्यवाही हे पथक करणार आहे. या पथकाने पकडलेल्या भटक्या आणि मोकाट कुत्र्यांना पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे नेण्यात आले.तेथे त्यांच्यावर निर्बीजीकरण प्रक्रिया केली जाणार आहे. पहिल्या दिवशी या पथकाने २२ मोठी आणि चार लहान कुत्र्यांना जेरबंद केले आहे.

हॉटेलमधील खाद्यतेलाची तपासणी

अन्न औषध प्रशासनाची कारवाई

। महाड । वार्ताहर ।

दिवसेंदिवस हॉटेलमधील खाद्यपदार्थ खाण्याकडे नागरिकांचा कल वाढलेला आहे. या हॉटेलमधून वापरल्या जाणाऱ्या खाद्य तेलाची तपासणी अन्न औषध प्रशासनाच्या फूड ऑन व्हील या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून नुकतीच करण्यात आली.

अन्न औषध प्रशासनाच्या बांद्रा-मुंबई कार्यालयाची फूड ऑन व्हील ही मोबाईल व्हॅन रायगड जिल्ह्यात दाखल झाली होती. या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून हॉटेलमध्ये वापरल्या जाणाऱ्या खाद्यतेलांची तपासणी करण्यात आली. महाड शहरातील काही हॉटेलमध्ये औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या डिजिटल तपासणी फ्राय ऑईल मॉनिटर या उपकरणाद्वारे तेलाची कॉलर कंपाऊंड चाचणी घेण्यात आली. हॉटेल, खाद्य पदार्थ स्टॉल, यामधून खाद्य पदार्थ तळण्यासाठी पुन्हा पुन्हा तेच तेल वापरले जाते यामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होतो. शासनाच्या अन्न औषध प्रशासनाने ही बाब गंभीरपणे घेतले असून, अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत जनजागृतीबरोबरच हॉटेलमधील या फ्राय तेलाची तपासणी केली जात आहे.

याकरिता आलेली फूड ऑन व्हील ही व्हॅन पेणपासून महाडपर्यंत आली होती. फूड ऑन व्हील या मोबाईल व्हॅनबरोबर अन्न औषध प्रशासनाचे हेमंत शेलार यांनी हॉटेलमध्ये वापर केलेल्या तेलाचे नमुने घेऊन तपासणी केली. खाद्यपदार्थ विक्रेतांमधून मिठाई उत्पादक, चायनीज स्टॉल, किरकोळ अन्नपदार्थ उत्पादक यांच्याकडून पुन्हा पुन्हा तेच वापरण्याचे वापरण्याचे प्रकार सर्रास सुरू असतात. याबाबत देखील विशेष तपासणी मोहीम आखून कारवाई केली जावी, अशी मागणी महाड पत्रकार संघाच्या वतीने यावेळी करण्यात आली आहे.

बळवंत वालेकरांचा 'आदर्श'कडून सत्कार

। कोलई । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार तथा साप्ताहिक कुलाबा वैभवचे संपादक बळवंत वालेकर यांनी वयाची ८० वर्षे पूर्ण केल्याबाबत व सहकार क्षेत्रात महाराष्ट्रातील अग्रगण्य पतसंस्था असलेल्या आदर्श नागरी सहकारी पतसंस्था अलिबागतर्फे त्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आदर्श पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजित पाटील, उपाध्यक्ष कैलास जगे, संचालक अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, संजय राऊत, विलाप तांडेल, डॉ. मकरंद आठवले, तज्ज्ञ संचालक वाणी, संस्थेच्या सीईओ मीनाक्षी पाटील यांसह बहुसंख्य भागधारक उपस्थित होते.

मुरुडचे तापमान २३ सेल्सिअसवर

गुलाबी थंडीने पर्यटकांना हुडहुडी

। मुरूड जंजिरा । वार्ताहर।

यंदा मुरूड तालुक्यात विचित्र हवामानामुळे थंडी उशिराने पडल्याचे जाणवले आहे. डिसेंबर महिन्यात पर्यटनाचा हंगाम सुरू झाल्यानंतर थंडीचे आगमन झाल्याने पर्यटकदेखील खूष होताना दिसून येत आहेत. सध्या तालुक्यात सकाळी आणि रात्री उशिरा तापमान २३ सेल्सियसइतके खाली येत असून, थंडीचा जोर वाढल्याने स्थानिकांसह पर्यटकांनाही हुडहुडी भरली आहे. या अल्हाददायक वातावरणामुळे आगामी काळात पर्यटन बहरणार आहे. नाताळला जोडून सुट्टी असल्याने तालुक्यात विक्रमी संख्येने पर्यटक हजेरी लावतील, असा विश्वास पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिक मंडळींनी व्यक्त केला आहे.

आगामी काळात पर्यटन अधिक बहरणार

डिसेंबर महिन्यात थंडी आणि आल्हाददायक वातावरण असते. त्यामुळे पर्यटकांची वर्दळ वाढती असते. तालुक्यातील विविध पर्यटन स्थळांवर सांगली, सोलापूर, नाशिक, सातारा, पुणे, रायगड, बीड, खानदेश, धुळे येथून एसटी बसेसमधून शालेय सहली मोठ्या प्रमाणावर येण्यास सुरुवात झाली आहे. सायंकाळी सूर्यास्त, समुद्रकिनारा पाहणे, पाण्यातील जलक्रीडा आदींचा आनंद लुटण्यासाठी विद्यार्थी आतुर दिसून येत आहेत. जंजिरा जलदुर्ग सर्वांचे आकर्षण असल्याने येणारे विद्यार्थी आणि पर्यटक हमखास भेट देताना दिसत आहेत.टीव्ही मालिकेत जंजिरा पाहणे आणि प्रत्यक्षात येथे येऊन पाहणे यात जमीन अस्मानाचे अंतर असल्याचे अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांनी सांगितले.

अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारे रम्य आणि अप्रतिम असल्याने शालेय सहली आणि पर्यटक आकर्षित होताना दिसून येत आहेत. मुरूड समुद्रकिनाऱ्याचे सुशोभिकरण सुरू असून, किनाऱ्यावरच प्रशस्त पार्किंगचे काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. सुशोभीकरणाचे एकूण सर्व काम मार्चअखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी दिली. यासाठी सुमारे ११ कोटी खर्च येणार असून, निधी प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.

मार्केटमध्ये ताजी मासळी उपलब्ध

मुरुडच्या मासळी मार्केटमध्ये शुक्रवारी पापलेट, कोलंबी, हलवा आदी मच्छी उपलब्ध होती. मुरूडजवळील राजपुरी येथून सकाळी ही ताजी पापलेट काही प्रमाणात येत आहेत. शिवाय बांगडे, सुरमई, रावस, माखुल, मांदेली आदी प्रकारची ताजी मासळी आल्याचे दिसत होते. मात्र, मासळीचे दर अटकेपार आहेत. पापलेट जोडी ४००/– पर्यंत, तर कोलंबीचे सोडे १५०० ते १६०० रुपये किलोने विक्री करण्यात येत आहेत.

न्यायालयातील विनोद

विनोद हा निर्विष असावा अशी अपेक्षा असते. पण सध्या आपल्या न्यायालयांमध्ये जे काही घडत आहे तो निव्वळ ब्लॅक ह्यूमर किंवा काळा विनोद आहे. छगन भुजबळ यांच्याविरुध्दच्या भ्रष्टाचार प्रकरणाचे उदाहरण घ्या. मूळ दावा अंमलबजावणी संचालनालय किंवा ईडीने दाखल केला होता. भुजबळ यांना याबाबत अटक झाली होती. पण ईडीने हा दावा नुकताच मागे घेतला. या प्रकरणाची फाईल सापडत नाही आणि दावा नेमका कशाबाबत होता तेच आठवत नाही असा युक्तिवाद ईडीने दोन महिन्यांपूर्वी केला होता. न्यायालयानेही उदार धोरण स्वीकारून त्यांना काही दिवस दिले. हिंदी सिनेमात एखाद्या अपघातामध्ये नायक किंवा नायिकेची याददाश्त खो जाती है हे आपल्याला ठाऊक आहे. पण असा कोणताही उघड अपघात किंवा आघात झालेला नसताना ईडी आपली याददाश्त खो बैठी. नाही म्हणायला, मधल्या काळात एक अपघात नक्की झाला. भुजबळ हे अजितदादा गटासोबत भाजपच्या मांडीला मांडी लावून बसायला सरकारात गेले. हा एक अपघातच होता, पण भाजप सरकार आणि मंडळींसाठी तो सुखद होता. या अपघातानंतर भुजबळ हे अनेक गोष्टी विसरले व त्या बदल्यात आता ईडीलाही 'गझनी'ची बाधा झाली आहे. २०१६ मध्ये हा गुन्हा दाखल झाला तेव्हा भुजबळ शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. गंमत म्हणजे तेव्हा या राष्ट्रवादीने देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला न मागता पाठिंबा दिला होता. तरीही भुजबळ यांच्याविरुध्द कारवाई टळली नव्हती. भुजबळ आणि त्यांचे कुटुंबिय दोन वर्षे अटकेत होते. खुद्द भुजबळ बरेच दिवस तुरुंग-कम- जे.जे. इस्पितळात होते. त्या काळात त्यांनी बरेच वाचन वगैरे केले असे म्हणतात. जोतिबा फुल्यांचे पूर्वी वाचलेल्या आणि न वाचलेल्या विचारांचे मनन केले असेही ऐकिवात आहे. २०१८ मध्ये ते अखेर तुरुंगाबाहेर आले.

विस्मरणाचे राजकारण

पुढची दोन वर्षे ते भाजप आणि नरेंद्र मोदी यांचे कडवे टीकाकार होते. त्यांच्या तेव्हाच्या अनेक भाषणांचे व्हिडिओ उपलब्ध आहेत. नोव्हेंबर २०१९ मध्ये भुजबळच नव्हे तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार हेदेखील पूर्वीच्या अनेक गोष्टी विसरले व एकत्र आले. त्या मंत्रिमंडळात भुजबळ मंत्री झाले. त्या गाडीला एकनाथ शिंदे यांच्या बंडाने धक्का बसला आणि उद्धव, भुजबळ यांच्यासह अनेक लोक सत्तेच्या बाहेर फेकले गेले. पण अजितदादा यंदाच्या जुलैमध्ये 'शुध्दी'वर आले आणि त्यांच्यासोबत भुजबळही नव्या गाडीत बसले. ती तीन चालकांची गाडी चालू झाली तो धक्का ईडीला पुरेसा होता. सप्टेंबरमध्ये त्यांनी न्यायालयाला आपल्या विस्मरणाची खबर दिली. अखेर न्यायालयाने कनवाळूपणे चार दिवसांपूर्वी हा खटला काढून टाकण्यास अनुमती दिली. आता यातही एक गंमत आहे. मूळ गुन्हा भुजबळ आणि मंडळी यांच्याविरुध्द होता. आता छगन भुजबळ आणि पुतणे समीर हे यातून सुटले असले तरी मुलगा पंकज भुजबळ यांच्याविरुध्दचा खटला कायम आहे. भुजबळांमधले सर्वात कर्ते पुरुष छगन व समीर हेच आहेत. महाराष्ट्र सदन घोटाळ्यामध्ये मंत्री म्हणून छगन यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप होता. बाकींच्याविरुध्दचे आरोप आनुषंगिक होते. आता मूळ आरोप गायब झाला तरी आनुषंगिक बाकी आहे अशी अद्भुत स्थिती निर्माण झाली आहे. दुसरे म्हणजे भुजबळ यांच्याविरुध्द नेमका काय आरोप केला हे लक्षात येत नसताना पंकज याच्याविरुध्दचे आरोप मात्र ईडीला खडा न खडा पाठ आहेत हा हिंदी सिनेमात शोभणारा विनोद म्हणावा लागेल. दुर्दैवाची गोष्ट अशी न्यायालयाने ती वस्तुस्थिती म्हणून मान्य केली आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नात भुजबळांनी ओबीसींची बाजू लावून धरली आहे. ती भूमिका तंतोतंत भाजपला हवी तशी आहे. शिवाय, मराठा आंदोलकांवरील पोलिसी लाठीमार कसा समर्थनीय होता हे दाखवून देऊन त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची सोडवणूक केली आहे. या सर्व सुखद अपघातांमुळेच ईडीची याददाश्त गेली का हा खरा प्रश्न आहे.

हसण्यावारी नेऊ नका

गेल्या काही दिवसात न्यायालयात आणखी एक विनोद मात्र होता होता राहिला. पुण्याच्या लोकसभा पोटनिवडणुकीचे हे प्रकरण होते. पुण्याचे भाजपचे खासदार गिरीश बापट यांचे २९ मार्च रोजी निधन झाले. कायद्यानुसार सहा महिन्यांहून अधिक काळ ही जागा रिकामी ठेवता येत नाही. पुढची लोकसभा जून २०२४ मध्ये अस्तित्वात येणे अपेक्षित आहे. म्हणजे जागा बराच काळ रिकामी राहणार होती व निवडणूक घेण्यास पुरेसा अवधी होता. याच दरम्यान देशात इतरत्र अशा पोटनिवडणुका झाल्यादेखील. पण महाराष्ट्रात मात्र ती टाळण्यात आली. पुढील वर्षीच्या लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी सर्व यंत्रणा कामात गुंतलेली असल्याने ही पोटनिवडणूक घेणे शक्य नसल्याचे अजब कारण निवडणूक आयोगाने न्यायालयात दिले. न्यायालयाने ते मान्य केले नाही व आता त्यांना निवडणूक घेण्याचे आदेश दिले आहेत. निवडणूक आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. तिने स्वायत्तपणे कारभार करावा अशी अपेक्षा असते. पण गेल्या काही काळात आयोगाने वारंवार अपेक्षाभंग केला आहे. फडणवीस व शिंदे यांनी शिवसेना फोडल्यापासून जनतेत प्रचंड नाराजी आहे. तिचा आपल्याला फटका बसू शकतो अशी भीती सत्ताधाऱ्यांना वाटते आहे. कसबा व अंधेरीच्या पोटनिवडणुकीत याची चुणूक दिसली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंत कोणत्याही निवडणुका घेण्यास शिंदे सरकार तयार नाही. शिंदे किंवा कोणत्याही सरकारचे रक्षण करणे ही काही आयोगाची जबाबदारी नाही. किंबहुना, त्याने स्वतंत्रपणे व नियमानुसार निर्णय घेणे हेच अपेक्षित आहे. मात्र त्याऐवजी निवडणूक न घेण्यासाठी न पटणारी कारणे देण्यात आली. सुदैवाने न्यायालयाने ती फेटाळून लावली व स्पष्ट शब्दात आयोगाला आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. एका न्यायालयाने भुजबळ प्रकरणातला 'काळा विनोद' मान्य केला तरी दुसऱ्या न्यायालयाने दुसरा प्रकार हसण्यावारी नेला नाही हीच आजच्या काळातील दिलासा देणारी गोष्ट म्हणावी लागेल.

विचार

तेलंगणाच्या अंगणात....!

हरीश केंची

लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम समजल्या गेलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत राजस्थान, उत्तराखंड आणि आधी काँग्रेस मग भाजपकडे गेलेला मध्यप्रदेश ही भाजपला मिळालीत तर बीआरएसकडे असलेला तेलंगणा मात्र काँग्रेसला मिळाला. मिझोरम स्थानिक आघाडीला मिळाला. प्रसिद्धी माध्यमातून भाजपच्या यशाचं महिमामंडन केलं गेलं, मात्र तेलंगणातल्या काँग्रेसच्या यशाची फारशी चर्चाच झाली नाही. राजस्थानात अशोक गेहलोत आणि राजेश पायलट यांच्यातलं वितुष्ट, यामुळं गुज्जर समाजाची मतं काँग्रेसला मिळाली नाहीत. गेहलोत यांचा अती आत्मविश्वास, चुकीचे उमेदवार निवडले, समर्थकांना उमेदवारी देण्याचा आग्रह, पायलट समर्थकांना वगळण्याची चाल यामुळं त्यांना अपयशाला सामोरं जावं लागलं. तर मध्यप्रदेशात संजय गांधीचे वर्गमित्र असलेल्या कमलनाथ यांचा उन्मत्तपणा, त्यांनी पक्षानं पाठवलेल्या प्रत्येक प्रभारींचा सतत केलेला उपमर्द, अवहेलना, प्रचार रणनितीकार सुनील कानाबोलू यांचा केलेला तिरस्कार हा काँग्रेसला नडला. सुनील यांनी कर्नाटक आणि तेलंगणा इथं रणनीती आखली होती. यश मिळवलं होतं. तिकडे उत्तराखंडमध्ये बघेल यांच्या उरावर उपमुख्यमंत्री म्हणून वयोवृद्ध राजा सिंगदेव यांना काँग्रेसनं बसवलं. सिंगदेवांना मुख्यमंत्री व्हायचं होतं त्यामुळं त्यांनी बघेलांच्या समर्थकांना पाडण्याचा केलेला प्रयत्न काँग्रेसच्या अंगाशी आला. सगळ्या सर्वेक्षणात इथं काँग्रेसच येणार असं सांगितलं जातं होतं, पण सिंगदेवाच्या वागणं अंगलट आलं. मात्र तेलंगणात कर्नाटकातल्या डी.शिवकुमार यांच्याप्रमाणे रेवंत रेड्डी यांना काँग्रेसच्या हायकमांडनं एकहाती स्वातंत्र्य दिलं त्यामुळं काँग्रेसला यश मिळू शकलं.

गेल्या वर्षभराहून अधिक काळ भाजपनं तेलंगणा ढवळून काढला होता. बीआरएसमधल्या अनेकांना जवळ केलं होतं. पक्षविस्तारासाठी भाजप प्रांताध्यक्ष खासदार बंडी संजयकुमार यांनी पक्षाचे प्रभारी श्रीनिवास मंत्री यांच्यासाथीनं राज्यात मोर्चेबांधणी केली. दरम्यान इथं झालेल्या चार पोटनिवडणुकीत तीन ठिकाणी यश मिळवलं. हैद्राबाद महापालिकेतही लक्षणीय यश मिळवलं. या घडामोडीनं तेलंगणाचं लक्ष भाजपकडे वेधलं गेलं. मग संजयकुमार बंडी यांनी केसीआर यांच्या कारभाराचे वाभाडे काढत त्यांच्या कुटुंबावर जबरदस्त प्रहार केले. त्यातच केसीआर यांच्या मंत्रिमंडळातले वरिष्ठ मंत्री आणि मागासवर्गीय समाजातले प्रभावी नेते राजेंद्र इटल यांना भाजपत सामील करून घेतलं. बंडी आणि इटल यांनी के. चंद्रशेखर राव-केसीआर, त्यांचे पुत्र के.तारक रामाराव-केटीआर, कन्या कविता आणि भाचे हरीश राव यांच्या भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे वेशीवर टांगली. दरम्यान दिल्लीत 'शराब घोटाळा' झाला. तिथल्या केजरीवाल सरकारमधले तीन मंत्री तुरुंगात गेले. या शराब घोटाळ्यात केसीआर कन्या कविता यांचंही नाव पुढं आलं. त्यांची इडीनं चौकशी केली. कवितांच्या काही समर्थकांची धरपकडही झाली. त्यानंतर भाजपनं कविता, केसीआर यांच्यावरची टीका अधिक टोकदार केली. शराब घोटाळ्यातला सारा व्यवहार हा कवितांना फारसा माहीत असणं शक्य नाही. तर तो व्यवहार केसीआर यांनीच केलाय, त्यामुळं या दिल्लीतल्या शराब घोटाळ्यामागचा मास्टरमाईंड हा केसीआरच आहेत. असा आरोप केला गेला. लवकरच कविता आणि केसीआर यांच्यावर इडी कारवाई करील त्यांना तुरुंगात डांबतील अशी अपेक्षा तेलंगणावासियांची आणि भाजपची होती. तसं वातावरण निर्माण झालं होतं. पण त्यांचा भ्रमनिरास झाला. कविता यांच्याशी संबधित काहीना तुरुंगात टाकलं गेलं पण कविता वा केसीआर यांना हात लावला गेला नाही. भाजप नेत्यांच्या या अवसानघातकी भूमिकेमुळे कार्यकर्त्यांचाही नेत्यांवर विश्वास उडाला. दरम्यान केसीआर यांच्यावर घणाघाती टीका करणाऱ्या बंडी संजयकुमार यांच्या पाठीशी ताकद उभी करण्याऐवजी त्यांनाच प्रांताध्यक्षपदावरून हटवलं गेलं. प्रभारी श्रीनिवास मंत्री यांना चंदीगडला पाठवलं गेलं. बंडी यांच्याजागी केंद्रीयमंत्री जी.किशन रेड्डी यांच्याकडे पक्षाची सूत्रे सोपविली गेली. साहजिकच तेलंगणातलं केसीआर यांच्या विरोधात वातावरण तापवणारे बंडी संजयकुमार आणि त्यांचे सहकारी नाराज झाले. शिवाय त्यांनी बीआरएसमधून भाजपत आणलेले राजेंद्र इटल यांच्यासारखे प्रभावी नेतेही दुखावले गेले. गल्लीत कुस्ती, दिल्लीत दोस्ती यानुसार दिल्लीतल्या भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी केसीआर यांच्याकडे दुर्लक्ष केलं. किंबहुना त्यांना मदत करण्याचीच भूमिका घेतली. बीआरएसला आर्थिक मदत करणारे मोठे ठेकेदार माय्युर रामेश्वर राव यांनी २-४ एकर खाणीची खोदाई करण्याची परवानगी घेऊन शेकडो एकरची खोदाई केली. याबाबत आणि पाटबंधारे खात्याचे ठेकेदार मेगा कृष्णा रेड्डी यांच्या भ्रष्टाचारचे अनेक पुरावे दिल्लीतल्या वरिष्ठांकडे बंडींनी सोपवले असतानाही त्यावर केंद्र सरकारनं कोणतीच कारवाई केली नाही. मिशन भगीरथ, फिनिक्स, प्रगती भवन, नवीन सेक्रेटरीएटचं बांधकाम अशा काही योजना, केसीआर मंत्रिमंडळातल्या अनेक मंत्र्यांच्या गैरव्यवहाराची, भ्रष्टाचाराची प्रकरणे ही गोपनीय कागदपत्रांच्या पुराव्यांसह दिली. कालेश्वरम प्रकल्प, खाणी वाटप, दलित बंधू, रयतू बंधू या योजनातला भ्रष्टाचार प्रभावीपणे पक्षाच्या नेत्यांसमोर आणि लोकांसमोर मांडला. परंतु दिल्लीनं जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं गेलं. त्यामुळं बीआरएस-भारतीय राष्ट्र समिती ही भाजपची बी टीम असल्याचं इथल्या लोकांची भावना झाली. तशी उघड चर्चा माध्यमांतून आणि लोकांमध्ये होऊ लागली. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या मते, आंध्रप्रदेश आणि तेलंगणातल्या लोकसभेच्या ४५ जागा या २०२४ च्या सत्तेसाठी महत्वाच्या आहेत. त्यासाठी केसीआर, जगनमोहन रेड्डी, चंद्राबाबू नायडू ही भाजपची बी टीम असल्यानं त्यांना दुखवायचं नाही अशी भाजपची भूमिका असल्यानं केसीआर यांच्यावर कारवाई झाली नाही. त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला. भाजपनं इतर राज्यातल्या घोषणाच इथं वापरल्या. तेलंगणाच्या मनोभावना, आकांक्षा याचा त्यात कुठे लवलेश नव्हता. त्याचाही परिणाम झाला. भाजपला दारुण आणि अपमानजनक अशा पराभवाला सामोरं जावं लागलं.

इकडे रेवंत रेड्डी यांनी पराभूत मनोवृत्तीच्या काँग्रेसमध्ये प्राण फुंकला. राहुल गांधींच्या भारत जोडोमुळे लोकजागृती झालीच होती. दुरावलेल्या काँग्रेसी नेत्यांना रेवंत रेड्डी यांनी गोंजारलं, आत्मविश्वास निर्माण केला. केसीआर यांचा पराभव होऊ शकतो हे दाखवून दिलं. तेलुगु देसम पक्षाच्या नेत्यांनाही जवळ केलं. नाराज झालेल्या भाजपच्या, संघाच्या आणि कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना त्यांनी आशेचा किरण दाखवला. केसीआर-बीआरएस यांच्याविरोधातलं वातावरण तापलेलं होतंच, त्यावर रेवंत रेड्डी यांनी अखेरचा घाव घातला. अन् के.चंद्रशेखर राव, भारत राष्ट्र समितीचा वटवृक्ष उन्मळून पडला! भारत राष्ट्र समिती-बीआरएसचा पराभव करून काँग्रेसनं विजय मिळवलाय. ११९ सदस्यीय विधानसभेत ६० जागांचा जादुई आकडा पार केला अन् सरकार स्थापन केलंय. २०१४ ला आंध्रप्रदेशातून वेगळं झाल्यानंतर नव्या तेलंगणात बीआरएसनं सरकार स्थापन केलं. २०१८ लाही त्यांना प्रचंड बहुमत मिळालं. दोन्ही वेळा 'स्वर्णीम तेलंगणा' च्या आश्वासनावर पक्ष सत्तेवर आला. पण शेतकरी, तरुण, दलित आणि मागासवर्गीयांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्यानं, बीआरएसची पकड कमकुवत होत गेली. जनतेतल्या असंतोषाचा फायदा काँग्रेसनं घेतला. बेरोजगारी, कृषी संकट, भ्रष्टाचार, घराणेशाही आणि विकासाचा अभाव हे मुद्दे काँग्रेसनं मांडले. बेरोजगारी, पेपरफुटीसारखे मुद्दे उपस्थित केले. नोकरभरतीवरून बेरोजगारांकडून आंदोलनं होत होती. भरतीला होणारा विलंब, इंटर, पीएससी परीक्षांची गळती आणि गट परीक्षा पुढे ढकलण्यानं तरुणांनी बीआरएसला दूर ठेवलं.

बीआरएस सरकारनं दिलेल्या 'बेरोजगारांना भत्ता ' या आश्वासनाचीही अंमलबजावणी न झाल्यानं तरुणांमध्ये नाराजी होती. त्यासाठी बीआरएसनं निवडणुकी आधी 'विद्यार्थी आणि युवजन' सारखे कार्यक्रम सुरू केले. सरकारनं 'धारणी' हे पोर्टल तयार केलं, या पोर्टलमुळे भाडेकरू शेतकऱ्यांचं नुकसान झाल्याचा आरोप झाला. याचा फायदा जमीनदारांनाच होत असल्याची तक्रार होती. अनेक ठिकाणी लोकांना वाटण्यात आलेल्या जमिनी प्रत्यक्षात जमीनदारांच्याच नावावर झाल्या. केसीआर सरकारनं दलितबंधू योजना सुरू केली. याचा लाभ केवळ सत्ताधारी पक्षाशी संबंधित लोकांना विशेषत: आमदारांना मिळाला, त्यात कट-कमिशनचे आरोप झाले. गरीब आणि वंचित घटकांना घोषित केलेली 'डबल बेडरूम ची घरे' देण्यात सरकारला अपयश आलं. महत्त्वाकांक्षी कालेश्वरम प्रकल्पातल्या मेडिगड्डा बॅरेजमध्ये भ्रष्टाचाराचे आरोप झाले. यात गुणवत्तेशी संबंधित त्रुटीही निदर्शनाला आल्या. कर्नाटकपाठोपाठ तेलंगणातही काँग्रेसला 'हमीभाव ' कामी आला. महिला, आदिवासी आणि शेतकऱ्यांशी निगडित प्रश्नही गाजले. सत्तेत आल्यावर समाजातल्या सर्व घटकांसाठी काम करण्याचं आश्वासनही काँग्रेसनं दिलं. महिलांसाठी महालक्ष्मी, इंदिराम्मा, गृहज्योती या योजना सुरू करण्याचे आश्वासन त्यांनी दिलं.

काँग्रेस पक्षानं तिथं ११९ पैकी ६४ जागा जिंकल्यात आणि केसीआर-के.चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस -भारत राष्ट्र समितीला सत्तेतून बाहेर हुसकावलं. ५४ वर्षीय रेवंत रेड्डी यांचा राजकीय प्रवास हा अभाविपचा सक्रिय नेता म्हणून झाला. २००१ ला त्यांनी राजकारणात प्रवेश केला. प्रारंभी रेवंत यांनी काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकल्या. त्यानंतर चंद्राबाबू नायडू यांनी त्यांची क्षमता ओळखून त्यांचा पक्षात समावेश केला. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत कोडंगलमधून उमेदवारी दिली. पाच वेळा काँग्रेसचे आमदार असलेले गुरुनाथ रेड्डी यांचा त्यांनी पराभव केला. रेवंत यांची वचनबद्धता पाहून त्यांना पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली. नायडूंनी त्यांना विधानसभेत पक्षाचे नेतेही केले. २०१४ मध्ये जेव्हा आंध्रप्रदेशचं विभाजन झालं आणि तेलंगणा वेगळं राज्य बनलं, तेव्हा रेवंत यांना तेलंगणातल्या पक्षाची जबाबदारी दिली. पण, तेलुगु देशम तेलंगणा निर्मिती विरोधात असल्यानं त्यांना फारसा पाठिंबा मिळाला नाही. दरम्यान, २०१५ साली संपूर्ण तेलंगणात रेवंत यांनी खळबळ उडवून दिली. विधान परिषदेच्या निवडणुकीत पैसे देऊन मतं विकत घेतल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. रेवंतना तुरुंगात जावं लागलं. त्याच दरम्यान मुलीच्या लग्नात काही काळ ते जामिनावर बाहेर आले, नंतर पुन्हा तुरुंगात परतावं लागलं. केसीआर सरकारवर जोरदार टीका, आंदोलनं आणि निदर्शनं केल्याबद्दल रेवंत यांच्यावर दोनशेहून अधिक गुन्हे दाखल झालेत. तेलंगणात केसीआर यांना जर कोणी पराभूत करू शकत असेल तर ते फक्त रेवंत रेड्डीच, हे जनतेला पटवून देण्यात ते यशस्वी झाले. ते माजी केंद्रीय मंत्री जयपाल रेड्डी यांची भाची गीता यांच्या प्रेमात पडले. गीताचे कुटुंबीय या नात्यासाठी तयार नव्हते. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या, पण त्यांचं प्रेम अतूट राहिलं. शेवटी, दोघेही त्यांच्या कुटुंबियांना पटवण्यात यशस्वी झाले आणि १९९२ मध्ये त्यांच्या प्रेमाचा विजय झाला ते विवाहबध्द झाले. रेड्डी यांनी प्रचारात, २००४ ते २०१४ पर्यंत दिलेली पेन्शन ही आमची योजना होती. कर्जमाफी, इंदिरा आवास योजना, बेरोजगारांना पैसे देण्याची योजना आमची होती. आम्ही एका वर्षात दोन लाख नोकऱ्या देण्याचं आश्वासन दिलं. सोबतच तेलंगणाची स्थापना काँग्रेसनंच केली, हेही मतदारांना पटवून दिलं. रेवंत रेड्डी कोडंगल आणि कामारेड्डी या दोन जागांवर निवडणूक लढवत होते. कोडंगल ही त्यांची पारंपारिक जागा आहे तर कामारेड्डीमध्ये त्यांची थेट मुख्यमंत्री केसीआर यांच्याशी लढत होती. कामारेड्डीत त्यांचा पराभव झाला. त्यावर ते म्हणाले, ''इंदिराजींचा पराभव झाला, एनटीआर हरले, आणि आता केसीआर यांचा नंबर आहे, त्यांचाही पराभव होऊ शकतो...!'' हे त्यांनी सत्यात उतरवलं!

आजकाल

भ्रष्टाचारविरोधी जनसंसदेची स्थापना

जनसंसदेची स्थापना.. एकेकाळी महाराष्ट्रात मंत्री व अधिकारी भ्रष्टाचाराच्या आरोपाने घरी पाठवलेले भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन अण्णा हजारे यांनी नुकतेच विसर्जित केले व कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे हेच काम आपल्या गावात करावे अशी भावना व्यक्त केली. भ्रष्टाचारासारख्या स्फोटक विषयावर काम करणारी संघटना आपल्या नंतर चुकीच्या मार्गाने जाण्यापेक्षा विसर्जित करण्याचा वयोमानानुसार त्यांचा तो निर्णय योग्य होता.

त्यामुळे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाच्या राज्यातील सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येत विचार मंथन केले व आता जनसंसद या नावाने जन आंदोलनाची नुकतीच अहमदनगर येथे अशोक सब्बन यांच्या नेतृत्वाखाली स्थापना केली. २६ जिल्ह्यातील कार्यकर्ते या जनआंदोलनात सहभागी झाले आहेत. ही अभूतपूर्व अशी घटना आहे. अण्णा हजारे यांच्या सोबत दीर्घकाळ काम केलेल्या यातील अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या जिल्ह्यात तालुक्यात संघर्ष केला आहे. राजकीय नेते, भ्रष्ट अधिकारी यांच्याशी दोन हात केले आहेत. गडचिरोली जिल्ह्यात ७००० लोकांचा मोर्चा काढणारे कार्यकर्ते ही यात आहेत. अतिशय गरीब कुटुंबातील हे कार्यकर्ते गेली २५ वर्षे काम करत आहेत. प्रत्यक्ष सरकारी अनागोंदी व्यवस्थेत कसा हस्तक्षेप करावा ? यासाठी अनेक प्रशिक्षणे या कार्यकर्त्यांची झालेली आहेत. सर्व सरकारी विभागांचा अभ्यास असणारे हे महत्वाचे अनुभवी कार्यकर्ते एकत्र येत आहेत हे अतिशय आश्वासक आहे. शिक्षण ,आरोग्य, रोजगार, भ्रष्टाचार अशा महत्वाच्या प्रश्नावर हे कार्यकर्ते आता राज्यभर संघर्ष करणार आहेत. राज्यात आज रस्त्यावर संघर्ष करणारे कार्यकर्ते कमी होत असताना अशी संघटना नक्कीच महत्वाची ठरेल. जनसंसद अध्यक्ष म्हणून निवड झालेले अशोक सब्बन हे एक समर्पित व्यक्तिमत्व आहे. गेली ३५ वर्षे त्यांनी अण्णा हजारे यांच्या जन आंदोलनात ३५ वर्षे सचिव म्हणून काम केले आहे. अण्णा सोबत अनेक जण आले आणि गेले पण अशोक अखेर पर्यंत निष्ठेने प्रसिद्धीत न येता काम करत राहिले. राज्याच्या रेशन समितीवर काम केले आहे. अविवाहित राहून पूर्णवेळ ते काम करत आहेत. मी या संस्थेचा विश्वस्त म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. राज्यातील ग्रामीण भागातील भ्रष्टाचार अनागोंदी यावर नियंत्रण ठेवणारे हे महत्वाचे संघटन ठरेल असा विश्वास वाटतो.. यात सहभागी होण्यासाठी अशोक सब्बन यांचा संपर्क ९४२२०८३२०६

.....

आमचे साऊ एकल महिला समितीचे अकोल्याचे कार्यकर्ते सुनील शेळके यांनी वडिलांच्या दशक्रिया विधीत श्रद्धांजली भाषण कोणाचेच न करता एक आदर्श पायंडा पाडला आहे.शेळके सरांचे वडील नुकतेच वारले. आजकाल दशक्रिया विधी म्हणजे शक्तिप्रदर्शन करण्याचे व राजकीय संबंध दाखवण्याचे ठिकाण झाले आहे.सर्व राजकीय कार्यकर्ते जमतात व श्रद्धांजलीची भाषणे करून आपले अस्तित्व दाखवतात. त्यामुळे हे कार्यक्रम २ ते ३ तास चालतात. नातेवाईक वैतागून जातात. पूर्वी दशक्रिया विधी हा फक्त नातेवाइकांचा विधी असायचा. नातेवाईक जमून सांत्वन करायचे. पण हळूहळू गावातील लोक व परिसर जमायला लागला. राजकीय नेत्यांना त्यातील स्पेस लक्षात आली आणि तिथे सर्वपक्षीय गर्दी जमू लागली. दु:खी नातेवाईक बसलेले आणि त्यांच्या समोर हे प्रदर्शन. लोक ही आपल्या कुटुंबाचे किती नेत्यांशी संबंध आहे हे दाखवण्यासाठी अनेक नेते गोळा करतात. दु:ख बाजूला ठेवून नेत्यांच्या जवळच्याकार्यकर्त्यांना सकाळीच फोन करून आठवणीने नेत्यांना आणण्याची गळ घालतात. नेत्यांना आठवण करतात... अनेकदा त्या प्रसिद्ध व्यक्तींचे वडील सामान्य माणूस म्हणून जगलेले असतात. त्यांच्याविषयी बोलायला काही नसते व भाषण करणाऱ्यांनी त्यांना बघितलेले ही नसते. अशावेळी त्या मृत व्यक्तीला अनेक सद्गुण लावायचे व निम्मे भाषण त्या जिवंत मुलाने कशी पितृसेवा केली यावर करायचे असा हा प्रकार असतो. याला वैतागून एका गावाने ग्रामसभेत दशक्रिया विधीत भाषणे होणार नाही म्हणून ठराव घेतला...

या पार्श्वभूमीवर सुनील शेळके हे सामाजिक कार्यकर्ते असल्याने मोठी गर्दी जमली असूनही किती प्रसिद्ध लोक आले याचे शक्तिप्रदर्शन त्यांनी केले नाही. उलट फक्त कीर्तन घेवून कार्यक्रम संपवला . यामुळे एक आदर्श घालून दिला आहे. लग्न आणि दहावा यातील भाषणे संपली की हळूहळू नेते तिथे जाणे थांबवतील आणि हे कार्यक्रम फक्त नातेवाइकांचे उरतील. त्यामुळे शेळके सरांनी केलेली सुरुवात महत्वाची आहे

हेरंब कुलकर्णी

व्हायरल

फोटोमध्ये न येणारे लोक

एखाद्या समारंभाचे फोटो बघताना माझ्या लक्षात येते की ज्याने काहीच कामे केली नाहीत असे अनेक चेहरे फोटोत आहेत. यांनी फक्त फोटोच्या वेळी उभे राहण्याचे काम केले. त्या वेळी माझे मन त्या लोकांचा शोध घेत असते, ज्यांना फोटो काढून घ्यायला सवड मिळाली नाही. ते फक्त कामच करीत राहिले.✻

म्हणून शत्रुघ्नाच्या कार्याकडे आपले लक्ष थोडे वेधले पाहिजे. कल्पना करा की, दोघे भाऊ वनात आहेत. श्री भरत नंदिग्रामात आहेत. चौदा वर्षेपर्यंत अयोध्येचे साम्राज्य सांभाळायचे आहे. ज्या साम्राज्याला राजा नाही असे राज्य सांभाळायचे आहे. तुम्ही राजनीतिशास्त्र कधी वाचले असेल. राजनीतिशास्त्रामधे राज्यावरचे सर्वात मोठे संकट अराजक हे आहे. म्हणून एखादा राजा मरण पावल्यावर त्याचा अग्निसंस्कार करण्यापूर्वी नवीन राजाचे नाव घोषित करावे लागते. राजनीतीप्रमाणे -असा एकही दिवस नसावा, ज्या दिवशी राजा नाही. अयोध्येला चौदा वर्षे राजा नाही. पादुकांची सेवा करीत श्रीभरत नंदिग्रामात बसलेले आहेत. दोघे भाऊ वनात आहेत. वडील स्वर्गाला गेले. मग अयोध्येचे राज्य चौदा वर्षे कोणी सांभाळले? ज्या ठिकाणी राजा नाही अशा ठिकाणची सेना अस्ताव्यस्त होते. काही लोक विद्रोह करतात. मंत्रिमंडळ, सेना, राज्याचा कोश हे सगळे सांभाळणे सामान्य गोष्ट नाही. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्चात काय काय भयानक घटना घडल्या ते शिवचरित्रात वाचा. म्हणजे एखाद्या मोठ्या माणसाच्या मृत्यूनंतर राज्यकारभार सांभाळणे किती अवघड असते ते लक्षात येईल. शत्रुघ्नाला फक्त राज्य सांभाळायचे नव्हते. घरामध्ये असलेल्या सहा महिलांना सांभाळायचे आहे. प्रत्येकीची मनोवृत्ती भिन्न आहे. कौसल्यामाता रात्रंदिवस अश्रुपात करते आहे. कैकयीमाता अंत:करणातून दग्ध होती. तिला आता आपल्या कर्माचा पश्चात्ताप होतो आहे. ऊर्मिलेच्या नेत्रातील आसवांना खळ नाही. मांडवीचा पती भरत अयोध्येच्या जवळच नंदिग्रामात आहे. पण ती तिथे जाऊन पतीला भेटू शकत नाही. थोडा या परिस्थितीचा विचार करा. पण चौदा वर्षे इतक्या महिलांना सुखावत सांभाळणे ही सामान्य गोष्ट नाही. शत्रुघ्नाचे जीवन यातच अर्पित आहे. सगळे कर्तृत्व या धाकट्या भावाचे आहे. अयोध्येचे संपूर्ण राज्य आणि सेना त्याने चौदा वर्षं सांभाळली. आणि एवढे करूनही चौदा वर्षांनंतर रामचंद्र परत आले, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी शत्रुघ्न सर्वांत पुढे नाही. पुढे गुरुदेव वसिष्ठ जातात. नंतर रामांच्या पादुका घेऊन भरत जातो. भगवान राम परत आल्यानंतर सारे जण राम-भरत-भेटीचे वर्णन करतात. पण शत्रुघ्नाचे वर्णन कोणी करत नाही. ही मंडळी फोटोकरता नाहीतच. पण ते फोटोत दिसत नाहीत, म्हणून त्यांनी काही काम केले नाही असे म्हणणे कृतघ्नपणा आहे. एखादे उत्तम देवालय उभे असते. लोक त्या देवालयाच्या शिखराकडे पाहतात. भिंतीकडे पाहतात. सुंदर कलाकुसर पाहतात. पण हे सगळे मंदिर पायातल्या ज्या दगडांवरती उभे असते त्या दगडांकडे कोणाचे लक्ष जात नाही. हे पायातले दगड जर विचार करतील की आपला फोटो कधीच निघत नाही. फक्त मंदिराच्या कळसाचा निघतो, तेव्हा फोटोग्राफर आल्यावर आपण जमिनीतून बाहेर येऊ, तर ते मंदिर किती वेळ उभे राहील? इतके सुंदर मंदिर उभे आहे, कारण पायातले दगड स्वत:ला गाडून त्या ठिकाणी स्थिर आहेत.

म्हणून मला तर नेहमीच वाटते की पायामध्ये गाडल्या गेलेल्या पत्थरांचा प्रतिनिधी म्हणून देवाच्या मंदिरात प्रवेश करताना आपण पायरीला प्रणाम करतो. त्याप्रमाणे रामायणाच्या मंदिरात प्रवेश करताना पहिला प्रणाम या शत्रुघ्नाला करणे फार आवश्यक आहे. कारण त्या पायाखालच्या दगडावर अयोध्येचे दिव्य वैभव उभे राहिले. आपल्या व्रताचे पालन करताना १४ वर्षात सिंहासनावर बसण्याचा क्षुद्र विचार शत्रुघ्नाच्या मनाला कधीही शिवला नाही. वनात राहून वनवासाचे नियम पाळणे सोपे आहे. नंद

कळंबोळीतील पोलाद बाजार टाकणार कात

या विकासकामांचा समावेश

या ठिकाणी असलेल्या १७ अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच बाजार समिती ६ ठिकाणी राखीव असलेल्या भूखंडावर बांधा, वापरा व हस्तांतरित करा, या तत्त्वावर सार्वजनिक शौचालयांची बांधणी करणार आहे. यासाठी एक संस्था नियुक्त करण्यात येणार आहे. तसेच भूखंडांना कुंपण घालणे, विविध रस्त्यांवर दिशादर्शक फलक, भूखंडांचे सीएसआर योजने अंतर्गत सुशोभीकरण करणे अशा प्रकारची कामे केली जाणार आहेत.

। पनवेल । वार्ताहर ।

आशिया खंडातील सर्वात मोठा बाजार म्हणून कळंबोलीमधील लोखंड पोलाद बाजार ओळखला जातो. या ठिकाणाहून देशाच्या कानाकोपऱ्यात लाखो टन लोखडांची आवक-जावक होते. त्यामुळे या ठिकाणांहून हजारो लहान-मोठी अवजड वाहने दररोज ये-जा करतात; तर या माध्यमातून लाखो रुपयांचा सेवा करही मिळत आहे. मात्र, असे असून कोणत्याही सुविधा दिल्या जात नसल्याने लोखंड पोलाद बाजार समितीने पायाभूत सुविधांसाठी ५२ कोटींच्या निधीची तरतूद केली आहे.

कळंबोलीतील पोलाद बाजारात पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी चोरीचे प्रमाण वाढले होते. अशा सर्व समस्यांचे निवारण करण्याकरिता बाजार समितीने रस्तेबांधणी, पथदिवे लावणे, बाजारात सहा शौचालयांची उभारणी, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ५० ठिकाणी १०० सीसी टीव्ही बसवणे, रस्त्यांची साफसफाई, पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सफाई, रस्त्यांच्या दुतर्फा सुशोभीकरण, बाजार आवारातील पथदिवे दुरुस्ती व देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत. यापैकी झालेल्या कामाचे लोकार्पण मंगळवारी (ता. १२) करण्यात आले; तर बाजार समितीतील उर्वरित कामेदेखील लवकरच केली जाणार आहेत. या कामाच्या उद्घाटनप्रसंगी अशोक गर्ग, प्रशांत पारेख, संगीता डोंगरे, गुलाबराव जगताप, रामदास शेवाळे, शेकापचे नेते प्रभुदास भोईर, बाजार समितीचे कार्यकारी अधिकारी अमिष श्रीवास्तव उपस्थित होते.

चिखलप येथे राष्ट्रीय सेवा योजनाचे शिबीर

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळ संचलित वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा यांच्या माध्यमातून चिखलप येथे राष्ट्रीय सेवा योजनाचे शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य महादेव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी विद्यार्थ्यांना एन.एस.एस. म्हणजे काय आणि त्याचे आपल्या जीवनात किती फायदे पटवून दिले. शिबिराचा फायदा आपल्या गावाला आणि कुटुंबाला कसा होईल ते आपण आत्मसात केले पाहिजे आणि प्रशासनाच्या माध्यमातून कोणतीही मदत लागली तर केव्हाही सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन राष्ट्रीय सेवायोजन शिबिराचा उद्देश आणि महत्व साध्य होणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास नाझीम चोगले, म्हसळा तहसीलदार समीर घारे, म्हसळा पो.नि.संदीपान सोनवणे, माजी सभापती छाया म्हात्रे, नंदकुमार गोविलकर, निजाम कागदी, प्रदीप कदम, योगेश पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे, संतोष शिंदे, सुशीला शिंदे, विजय शिंदे, सुनिल जाधव, राजेंद्र जाधव आदी महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुमित चव्हाण यांनी केले तर प्रा. कानिफ भोसले यांनी आभार मानले.

माथेरानमध्ये भारत संकल्प यात्रा

। माथेरान । वार्ताहर ।

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती गुरुवारी माथेरानमध्ये वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळा पटांगणात देण्यात आली. यावेळी बँकेच्या, पोस्टाच्या, आयुष्यमान भारत योजना, आयुष्यमान भारत आरोग्यदायी योजना, पीएम स्वनिधी योजना आणि नगरपालिका अंतर्गत देण्यात येणाऱ्या योजनाची माहिती यावेळी देण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा समन्वयक कैलास शिंदे, माथेरान नगरपालिकेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचा मेळावा

। सुतारवाडी । वार्ताहर ।

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या रोहा तालुका महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने समाज बांधवांचा रायगड जिल्हा संपर्क मेळावा शनिवार दि. २३ डिसेंबर रोजी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत नागोठणे येथील श्री जोगेश्वरी मातेच्या पावन भूमीत, आराधना भवन, बाजारपेठ, जैन मंदिरासमोर नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास विशेष मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी दिनदर्शिकेचे प्रकाशन, हळदीकुंकू समारंभ, विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, लकी ड्रॉ, आदी कार्यक्रम होणार आहेत. सदरील संपर्क मेळाव्यासाठी रायगड जिल्ह्यातील समाज बांधवांनी आपल्या कुटुंबासह वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरमध्ये फूटपाथवरती उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपाऱ्या, नीराकेंद्र, दुकानाबाहेरील शेड, फुटपाथवरील अतिक्रमण तसेच खांदेश्वर रेल्वे स्टेशन बाहेरील अनधिकृत दुकाने, टपऱ्या अशा विविध ठिकाणी खारघर प्रभाग कार्यालय व कामोठे प्रभाग कार्यालयाच्यावतीने शुक्रवारी आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार महापालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली.

खारघरमधील सेक्टर ८ ब, सेक्टर ५, सेक्टर ३५ ई अशा विविध ठिकाणी फूटपाथवरती अनधिकृत टपाऱ्या उभारण्यात आल्या होत्या. तसेच अनधिकृत नीराकेंद्र, दुकानाबाहेरील वाढवलेले शेड, हातगाड्याच्या संख्येमध्येही वाढ झाली होती. आयुक्तांनी दिलेल्या सूचनेनूसार प्रभाग समिती अ चे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी अतिक्रमण विभागाच्यासाह्याने या संपूर्ण खारघरमध्ये तोडक कारवाई केली. तसेच टपऱ्यांमधील, दुकानांमधील सर्व साहित्य जप्त करण्यात आले.

श्री भैरवनाथ मूर्तीचा जिर्णोद्धार

पाली/बेणसे : सुधागड तालुक्यातील पेडली येथील शिवकालीन ऐतिहासिक श्री भैरवनाथ मूर्तीचे प्राणप्रतिष्ठा व मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा शनिवार १६ व रविवार १७ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहून या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन व्यवस्थापक मंडळ यांनी केले आहे. या सोहळ्यानिमित्त येणाऱ्या भाविकांना होमहवन, हरिपाठ, मूर्ती मिरवणूक, किर्तन, कळस पूजन, भारुड याचा लाभ घेता येणार आहे. येणाऱ्या भाविकांच्या मनोरंजनासाठी शनिवारी रात्री ९ वाजता भारुडाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मतदार नोंदणीचे शिबीर

पनवेल : कळंबोली सेक्टर ४ येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त व बबन बारगजे यांच्या वाढदिवसानिमित्त आधार कार्ड व नवीन मतदार नोंदणीचे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरास प्रचंड प्रतिसाद लाभला असून विभागातील अनेक नागरिकांनी प्रतिसाद दिला. या शिबिरास रविनाथ पाटील, अमर पाटील, सुभाष आंधळे, हनुमंत विघ्ने, किरण गीते, भगवान जायभाय, पप्पू सोनवणे, तुकाराम केदार उपस्थित होते.

मसूद दर्जी यांचे निधन

दिघी : श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील ज्येष्ठ शिवसैनिक मसूद दर्जी (वय ७२) यांचे गुरुवारी रात्री हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. दर्जी हे ज्येष्ठ शिवसैनिक म्हणून ओळख असलेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दक्षिण रायगड अल्पसंख्यांक जिल्हा प्रमुखपदी कार्यरत होते. त्यांनी तालुक्यात पक्ष वाढीसाठी काम करत असताना अनेक तरुणांना शिवसेनेशी जोडले होते. त्यामुळे त्यांचा सर्व घटकांशी उत्तम सलोखा राहिला आहे. या दुःखद घटनेमुळे शिवसेना पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

दिव्यांगांना कृत्रिम अवयव शिबिराचे आयोजन

। खांब । वार्ताहर ।

दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव देण्यासंदर्भात मोजमाप कार्यक्रमाचे आयोजन रायगड जिल्ह्यात तालुकानिहाय दि.१६ ते २४ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे.

यानुसार रोहा तालुक्यात दि.२१ डिसेंबर रोजी जेष्ठ नागरिक समागृह येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात तीन चाकी सायकल, कॅलीपर, कुबड्या, कृत्रिम हात, कृत्रिम पाय, सीपीचेअर, व्हीलचेअर, ब्लाइंड डिजिटल स्टीक, मतिमंद मुलांसाठी शैक्षणिक कीट, कानाचे डिजीटल श्रवणयंत्र, उच्च शिक्षण घेणाऱ्या १०० अंध दिव्यांग विद्यार्थ्यांना स्मार्ट मोबाईल फोन, ८० टक्के पेक्षा अधिक अस्थिव्यंग व्यक्तिंना बॅटरीवर चालणारी तीन चाकी सायकल आदी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग व्यक्तीकडे युडीआयडी प्रणालीचा वैद्यकीय मंडळाकडील ४० टक्केवरील दाखला असणे आवश्यक आहे. कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला रहिवासी दाखला व रेशनकार्ड झेरॉक्स, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड झेरॉक्स आदी बाबींची पुर्तता केलेली व्यक्तीच लाभधारक ठरणार आहे. या कार्यक्रमात दिव्यांग व्यक्ती हजर राहणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. अशा प्रकारची माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी डॉ. शामराव कदम यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

Change in name

I vandana Bharatkumar patel Resident at jeet Nagar, Thal, Tal-Alibag, Dist-Raigad 402207, Declate and Affirm as under, my old Name was vandanaben Bharatkumar patel. I have change my name to vandana Bharatkumar patel for all future purposes Affidavit No.m-23247443

Sign
Vandana Bharatkumar patel
(New name)

जाहीर नोटीस

याद्वारे सामान्य जनतेला नोटीस देण्यात येत आहे की, आमचे अशिल इच्छुक असल्याने आम्ही श्री.प्रदीप प्रभाकर गावंड (मालक) यांच्या मालमत्तेची विशेषतः खाली दिलेल्या परिशिष्टमध्ये वर्णन केलेल्या मालमत्ता याची चौकशी करत आहोत.

या मालमत्ते बाबत विक्री, देवाणघेवाण, भाडेपट्टे, भाडेकरू, परवाना, ट्रस्ट या मार्गाने किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विरोधात/वर/संबंधात/विरूद्ध/वर/ आक्षेप, हक्क, हित, हक्क, मागणी आणि/किंवा आक्षेप असलेली सर्व किंवा कोणतीही व्यक्ती वा संस्था, धारणाधिकार, देखभाल, सुलभता, वारसा, ताबा, संलग्न, गहाण, शुल्क, भेट, लिस-पेंडन्स, वहिवाट, एफ.एस.आय.भू संपादन वापर किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे आणि कोणत्याही प्रकारे झुंजारराव अँन्ड कंपनीला त्याची लेखी सूचना खालील पत्त्यावर देण्याची विनंती केली आहे. विक्रांत झुंजारराव अधिवक्ता आणि सॉलिसिटर, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ अशा हक्क, शिर्षक, व्याज, दावा, मागणी आणि किंवा आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, असे न झाल्यास असा कोणताही दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि जरी असा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असला तरीही, असे मानले जाईल दावेदाराने असा दावा, मागणी किंवा आक्षेप सोडला आहे आणि/किंवा असा दावा, मागणी किंवा आक्षेप वापरण्याचा कोणताही अधिकार सोडला आहे आणि ते आमच्या अशिल यांचेवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशिल वर विचार केल्याप्रमाणे खरेदी व्यवहारात पुढे जाऊ शकतात.

परिशिष्ट
(मालमत्तेचे वर्णन)

मौजे	भुमापन क्रमांक/ उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
नारंगी ता.अलिबाग	४९/२	०-१८-५० पो.ख.०-०१-०० एकूण ०-१९-५०	००.५८
	५५/१ ड	०-१५-१० पो.ख.०-०३-०० एकूण ०-१८-१०	००.३१
	सदर मिळकती या नोटीसीचा विषय आहे.		

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १६/१२/२०२३

झुंजारराव अँन्ड कंपनी करीता
अँड.विक्रांत झुंजारराव

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री.अर्जुन गणपत भगत, श्री.अनिल गणपत भगत, सौ.निर्मला गोपाळ धुळे, सौ.ताराबाई गणपत भगत यांनी त्यांचे स्वकष्टार्जित व वडीलोपार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील काही मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे तांबस, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी)	आकार (रू.पै.)
२५/५	०.४९.४० जिरायत ०.५८.०० वरकस ०.०६.६० पोटखराब	८.०१
	१.१४.०० एकूण क्षेत्रापैकी विकत दिले जाणारे क्षेत्र ०.३५.०० गुंठे	

तरी मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकुम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांचा नमूद केलेल्या पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : १६/१२/२०२३

सही/-
अँड.प्रणित एस भिंगारदिवे

कार्यालय : ऑफिस नंबर ५, पहिला मजला, नेमीनाथ शॉपिंग सेंटर, मुद्रे बुद्रुक, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१, मो नं. ९५९४९३०८८९

नमुना एन डी
नियम ९.२ (३) पहा
परवानाधारकाच्या उत्ताराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीची नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्रमांक MH 46/CC/Auto/2018/7930 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्रमांक MH 46-BQ-1185 चे मालक कै. कैलास मोतीराम पेठे यांचे तारीख १८/११/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती कविता कैलास पेठे पत्ता- मु. घर क्रमांक २०४, मोठे वेणगाव, दत्तमंदिर जवळ, ता. कर्जत, जि. रायगड उपरोलिक्खित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल रायगडच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल रायगडच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

उत्तराधिकाऱ्याचे नाव- श्रीमती कविता कैलास पेठे
पत्ता- घर क्रमांक २०४ मु. पोस्ट मोठे वेणगाव,
दत्त मंदिर जवळ, ता. कर्जत, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.विलास आगतराव माने, रा.पंतनगर, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या नावे असलेली बिनशेती मिळकत माझे स्नेही श्री.संदीप राजाराम म्हात्रे, रा.तांबडशेत, जोहे, ता.पेण, जि.रायगड यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	पोट नं.	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकार (रू.पै.)
चेंढरे ता.अलिबाग	३८/१/ब/८अ	-	१-९५-००	१९.५०

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १५/१२/२०२३

सही/-
जयवंत दत्तात्रेय म्हात्रे
पत्ता : रा.थेरोंडा (धाकलीवाडी), पो.चौल
ता.अलिबाग, जि.रायगड

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
निविदा सूचना

आर डी सी सी बँक सहाय्यास प्रगतीचा

बँकेच्या शाखांमध्ये बसविणेत आलेल्या एअर कंडीशनर्सचे मेंटेनन्सकरीता ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट करावयाचे आहे. त्याकरीता खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २२-१२-२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक - १६-१२-२०२३

सही/-
उपमुख्य कार्यकारी अधिकारी

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ॲड. श्री.डी.आर. उफाळे

पाली येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांचे न्यायालयात

इतर किरकोळ अर्ज २७/२०२३

श्री. मनोहर भिवा गायकवाड — अर्जदार
विरूद्ध
सामनेवाला — कोणीही नाही

जाहीर नोटीस

ज्याअर्थी, श्री. भिवा पिठाजी गायकवाड हे राहणार मु. झाप, पो. पाली, ता. सुधागड, जि. रायगड येथे मयत झाले असून त्यांचा मृत्यू दि. ०२/०२/१९९९ रोजी झाला असून मयत कै. भिवा पिठाजी गायकवाड यांना त्यांचे मृत्यूसमयी पुढीलप्रमाणे वारस आहेत. श्री. मनोहर भिवा गायकवाड मुलगा, तर नमूद केलेल्या वारसाशिवाय मयत कै. भिवा पिठाजी गायकवाड यांना दुसरे कोणीही वारस नाहीत. मयत कै. भिवा पिठाजी गायकवाड यांचे जवळचे वारस म्हणून वरील श्री. मनोहर भिवा गायकवाड त्या कारणाने अर्जदारांनी मे. न्यायालयात वारस दाखला मिळण्याबाबत ज्या कोणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसात सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि. १२/१२/२०२३ रोजी दिली.

सही/-
क. लिपीक
दिवाणी न्यायालय पाली, सुधागड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय पाली, सुधागड

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे. मो. ७४४७४८०००० .....
- साईराज ट्रॅव्हल आयोजित- * आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश- ३३०००/-, १४ एप्रिल. * वैष्णोदेवी, काश्मीर ५ मे १९०००/- IIIAC प्रवास हॉटेलव्यवस्था स्थळदर्शन MAP प्लॅन संपर्क : ७३८७१६४१९८/७०२००५९९१५. .....
- मशीन ऑपरेटर पाहिजे पात्रता III ठिकाण-बामणसुरे, चोंढी ८ तास ड्युटी, पगार-१०००० महिना Contact- 7350055976 .....
- घर कामासाठी बाई हवी आहे लहान बाळाला आंघोळ घालता येणे महत्त्वाचे आहे. कामाचे स्वरूप फोन करून समजून घेणे (राहण्याची व जेवणाची सोय केली जाईल.) पगार -८०००+ ठिकाण-संभाजीवाडा अलिबाग फोन- ८८८८२२०६७०/८५५१९६५१८९ .....
- अकाऊंटट पाहिजे : कमीत कमी ५ वर्षे अकाऊंटचा अनुभव, पगार- २०,००० महिना ठिकाण- बामणसुरे, चोंढी, मो. ९८२३५८५३२१ .....
- फ्लॅट भाड्याने मिळेल, RCF कॉलनीजवळ, ९४२३३७५१९८, ८४११०१६४४४ .....
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग .....
- मेडिकलमध्ये पार्ट टाईम कामासाठी Pharmacist पाहिजे. मुलगा किंवा मुलगी सिद्धांत मेडिकल अलिबाग पुष्पलता शिंदे women s Hospital मो.नं. ९११२११७०७९ .....
- लग्नासाठी वर पाहिजे आहे. वधूचे वय : २२ ठिकाण अलिबाग मोबाईल नं. ७५०७९०९४३१ बायोडाटा या मोबाईल नंबरवर पाठवणे. .....
- चौथीत शिकणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या मुलीचा घरी अभ्यास घेण्यासाठी अलिबाग शहर येथे मुलगी पाहिजे. संपर्क : ९८५०३४८५०६ .....
- सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८-११ पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य) संपर्क- ९७६२२२२९८३ .....
- अलिबाग रायवाडी कॉम्पलेक्स चेंढरे येथे ६२० स्क्वेअर फुट फ्लॅट विकणे आहे. संपर्क - ९८९२८०३०३९ (एजंट नको) .....

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

सूर्यकुमारचे झंझावाती शतक, कुलदीपचे पाच बळी

आफ्रिकेत- हा खेळ यादवांचा

। जोहान्सबर्ग । वृत्तसंस्था ।
कर्णधार सूर्यकुमार यादवचे झंझावाती विक्रमी शतक (१०० धावा) आणि कुलदीप यादवच्या फिरकीने (५-१७) यजमान दक्षिण आफ्रिकेची दैना उडाली. दोन्ही यादवांच्या सांघिक खेळीने भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यांना सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या महत्त्वपूर्ण ६० धावा आणि रवींद्र जडेजा (२/२५) यांच्यासह इतर गोलंदाजांनी केलेल्या प्रभावी कामगिरीच्या जोरावर भारतीय क्रिकेट संघाने अखेरच्या टी-२० लढतीत यजमान दक्षिण आफ्रिकेवर १०६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासहतीन टी-२० सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली.

- **दक्षिण आफ्रिकेचा १०६ धावांनी धुव्वा**
- **टी-२० मालिकेत साधली बरोबरी**

भारताकडून दक्षिण आफ्रिकन संघासमोर २०२ धावांचे आव्हान उभे ठाकले होते. मात्र, भारतीय गोलंदाजांसमोर दक्षिण आफ्रिकन संघातील फलंदाजांचा निभाव लागला नाही. मुकेशकुमारने मॅथ्यू ब्रिट्झकेला चार धावांवर बाद केले. त्यानंतर रिझा हेंड्रिक्स आठ धावांवर धावचीत झाला. कर्णधार एडन मार्करम व हेनरिक क्लासेन ही जोडी डाव सावरणार असे वाटत असतानाच अर्शदीप सिंगने क्लासेनला (५ धावा) व रवींद्र जडेजाने मार्करमला (२५ धावा) तंबूत पाठवत भारतासाठी मोलाची कामगिरी बजावली.

दक्षिण आफ्रिकन संघाची अवस्था ४ बाद ४२ धावा अशी झाली. त्यानंतर डेव्हिड मिलर याने एकाकी झुंज देण्याचा प्रयत्न केला. पण, कुलदीप यादव भारतासाठी धावून आला. त्याने मिलर (३५ धावा), डोनोवन फेरेरा (१२ धावा), केशव महाराज (१ धाव) व नांद्रे बर्गर (१ धाव), लिझाड विल्यम्स (०) यांना बाद करीत भारताचा विजय निश्चित केला. कुलदीपने १७ धावा देत निम्मा संघ गारद केला. दक्षिण आफ्रिकेचा डाव ९५ धावांत संपुष्टात आला.

त्याआधी दक्षिण आफ्रिकन संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. यशस्वी जयस्वाल व शुभमन गिल या सलामीच्या जोडीने २९ धावांची भागीदारी करताना आश्वासक सुरुवात करून दिली; मात्र केशव महाराजच्या एकाच षटकात भारताला दोन धक्के बसले. सुरुवातीला गिल आठ धावांवर, त्यानंतर तिलक वर्मा शून्यावर बाद झाला.

यशस्वी व सूर्यकुमार या जोडीने भारतासाठी किल्ला लढविला. दोघांनी ११२ धावांची भागीदारी करताना भारताला संकटातून बाहेर काढले. ही जोडी खेळपट्टीवर उभी राहून धावा करणार असे वाटत असतानाच तबरेझ शम्सीच्या गोलंदाजीवर यशस्वी ६० धावांवर रिझा हेंड्रिक्सकरवी झेलबाद झाला. यशस्वीने ६० धावांची खेळी ६ चौकार व ३ षटकारांनी सजवली. दक्षिण आफ्रिकेकडून विल्यम्स व महाराज यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

कुलदीप पहिला फिरकीपटू

फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या टी २० सामन्यात फक्त २.५ षटकात १७ धावा देत आफ्रिकेचा निम्मा संघ गारद केला. आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमध्ये निम्मा संघ गारद करण्याची ही कुलदीपची दुसरी वेळ आहे. याचबरोबर भारताकडून टी २० मध्ये दोनवेळा निम्मा संघ गारद करण्याची किमया करणारा कुलदीप यादव हा पहिला फिरकी गोलंदाज ठरला आहे.

भेंडखळ संघाने पटकावले विजेतेपद

। उरण । वार्ताहर ।

मास्टर क्रिकेट असोसिएशन, लोणावळा आयोजित मायक्रोस्कॅन प्रीमियर लीग ही १४ वर्षाखालील ४५ षटकांची लेदर क्रिकेट स्पर्धा लोणावळा (पुणे) येथे पार पडली. दि. १२ डिसेंबर रोजी नाईक अकादमी तळेगाव (पुणे) विरुद्ध बीसीए भेंडखळ (उरण) संघात अंतिम लढत झाली. या सामन्यात बीसीए भेंडखळ संघाच्या जिज्ञेश म्हात्रेच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर नाईक क्रिकेट अकादमी तळेगाव या तगड्या संघावर ६ गडी राखून मात केली आणि विजयी चषकावर आपल्या संघाचे नाव कोरले.

तत्पूर्वी, नाईक अकादमीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र बीसीए संघाकडून कर्णधार प्राणिकेत पाटील, विस्मय बल्लाळ, अर्णव पाटील, आरुष ठाकूर यांचा वेगवान मारा तर जिज्ञेश म्हात्रे, वेद कडूच्या फिरकी माऱ्यासमोर नाईक एकादमीचा डाव ४१.१षटकांत १८० धावांवर आटोपला. सलामीला आलेल्या आशुतोष भेगडेने २५ तर आधीच्या सामन्यात द्विशतक ठोकलेल्या साई बोऱ्हाडेने २७ धावा केल्या. याशिवाय कर्णधार जय अग्रवाल (२१), आरोही रावत (२०), आर्य पाटील (३०) यांनीही उपयुक्त खेळ्या केल्या. बीसीए संघाकडून जिज्ञेश म्हात्रे आणि वेद कडूने प्रत्येकी ३, तर अर्णव पाटील, विस्मय बल्लाळ, आरुष ठाकूरने एकेक बळी टिपला.

नेमबाजीत वैभवराजेला कांस्यपदक

पदकतालिकेत महाराष्ट्र पाचव्या स्थानावर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पहिल्या दिवसापासून खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धेत आगेकूच करणाऱ्या महाराष्ट्राच्या कामगिरीस गुरुवारी खीळ बसली. वैभवराजे रणदिवेच्या नेमबाजीतील कांस्यपदकाचा महाराष्ट्राला दिलासा मिळाला. आज एकाच पदकावर समाधान मानावे लागल्याने पदककालिकेत महाराष्ट्राला पाचव्या स्थानावर घसरावे लागले.

महाराष्ट्राची ८ सुवर्ण, ६ रौप्य आणि १२ कांस्य अशी एकूण २६ पदके झाली आहेत. हरियाणा (३४, ३६, १८) ८८ पदकांसह आघाडीवर कायम आहे. उत्तर प्रदेशाची (२४, १७, ९) ५०, तर तमिळनाडूची (१७, ६, ११) ३४ आणि गुजरातची (९, १५, ११) ३५ पदके झाली असून, ते अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत. महाराष्ट्राला गुरुवारी नेमबाजीत वैभवराजे रणदिवे याने १०९ मीटर एअर पिस्तूल एसएच १ प्रकारात कांस्यपदक मिळवून दिले. वैभवराजने पात्रता फेरीत १४३ गुणांची कमाई करताना मुख्य फेरीत प्रवेश केला होता. मुख्य फेरीत त्याचे प्रयत्न चांगले होते. पण, हरियाणाच्या मनिष नरवाल आणि राजस्थानच्या रुद्रांश खंडेलवाल यांच्या अचूकतेचा त्याला सामना करता आला नाही. वैभवराजला २११.६ गुणांसह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. १० मीटर एअर रायफल प्रोन एसएच २ प्रकारात नरेंद्र देवप्रयाग गुप्ताला ६१०.९ गुणांसह पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.

टेबल टेनिसपटूंची आगेकूच

टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राला ३ ते ४ पदकांची अपेक्षा आहे. अशोक कुमार पाल, दत्त प्रसाद चौगुले आणि विशाल तांबे यांनी पहिल्या फेरीत एकतर्फी विजय मिळविला. महिला विभागात पृथ्वी बर्वेलाच आगेकूच कायम राखता आली. नयना कांबळे आणि उर्मिला पाल यांना पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. पुरुष गटात स्वप्निल शेळकेचा पराभव झाला.

पत्रकार संघातर्फे जलतरणपटू मयंकचा सत्कार

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील करंजा कोंढरीपाडा येथील अवघ्या १० वर्षीय मयंक दिनेश म्हात्रे याने धरमतर जेट्टी ते करंजा जेट्टी हे १८ कि.मी. अंतर पार करून या प्रवाहावर कायमस्वरूपी आपले नाव कोरण्याचा विक्रम केला. याबद्दल उरण तालुका मराठी पत्रकार संघातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला.

दिनेश म्हात्रे यांचा सुपुत्र मयंक (१० वर्ष) याने रविवार ३ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजून १४ मिनिटांनी पेण तालुक्यातील धरमतर खाडीत उडी घेतली. सकाळी ९ वाजून २७ मिनिटांनी उरण तालुक्यातील करंजा जेट्टीवर पोहोचला. धरमतर जेट्टी ते करंजा जेट्टी हे १८ किलो मीटर अंतर असून, हे अंतर मयंक म्हात्रे यांनी केवळ ५ तास १३ मिनिटात पोहून पार केले. विशेष म्हणजे, मयंकने हा विक्रम पहिल्यांदाच केला. यापूर्वी त्याने अनेक जिल्हास्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेउन नेत्रदिपक यश मिळविले होते.

मयंक म्हात्रे हा उरण शहरातील सेंट मेरी स्कूलमध्ये इयत्ता ५ वीमध्ये शिकत आहे. त्याचे वडील दिनेश म्हात्रे, आई वीणा दिनेश म्हात्रे, मार्गदर्शक शिक्षक किशोर पाटील (केगाव दांडा), प्रशिक्षक हितेश भोईर (करंजा) यांचे मयंकला नेहमी मार्गदर्शन लाभले आहे. वयाच्या ५ व्या वर्षापासूनच मयंक पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेत आहे.

मयंकच्या या यशाबद्दल उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल येथील स्विमिंग पुलवर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू, उपाध्यक्ष विरेश मोडखरकर, दिलीप कडू, सदस्य पंकज ठाकूर, सुयोग गायकवाड, पूजा चव्हाण यांच्यासह मयंकचे आई-वडील व स्विमिंग पुलवरील विद्यार्थी व पालक वर्ग तसेच कोच हितेश भोईर व इतर उपस्थित होते.

जानेवारीत एनएमपीएलचा थरार

नवी मुंबई : अल्पावधीत महाराष्ट्रासह देशात लोकप्रिय ठरलेल्या नवी मुंबई प्रीमियर लीग अर्थात एनएमपीएल स्पर्धेचा शुभारंभ गुरुवारी नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष आ. संदीप नाईक यांच्या हस्ते वाशी येथे आय लिफ हॉटेलमध्ये नेत्रदीपक समारंभात करण्यात आला. दि. १७ ते २१ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये कोपरखैरणे येथील भूमिपुत्र मैदानावर या लीगमधील खेळाचा थरार नवी मुंबईकर क्रीडा रसिकांना अनुभवता येणार आहे.

भारताचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले

उपांत्य फेरीत जर्मनीकडून पराभव

। क्वालालम्पूर । वृत्तसंस्था ।

कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेच्या (२१ वर्षांखालील) उपांत्य फेरीत भारतीय युवा संघाला जर्मनीकडून १-४ असा दारुण पराभव पत्करावा लागला. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा ज्युनियर हॉकी विश्वचषक जिंकण्याचे भारताचे स्वप्न भंगले.

मलेशिया येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत क-गटातून दुसऱ्या स्थानासह सर्वप्रथम आगेकूच केली होती. मग उपांत्यपूर्व लढतीत त्यांनी नेदरलँड्सवर ४-३ अशी मात केली. त्यामुळे या सामन्यात भारत जर्मनीला कडवी झुंज देईल, असे अपेक्षित होते.

मात्र संपूर्ण लढतीत भारताने १२ पेनल्टी कॉर्नर्सवर गोल करण्याची संधी गमावली. याचा फटका अखेरीस संघाला बसला. सहा वेळच्या विजेत्या जर्मनीने मात्र मिळालेल्या दोन्ही पेनल्टी कॉर्नर्सचा पूरेपूर लाभ उचलत दोन्ही वेळेस गोल केले.

भारताकडून सुदीप चिरमाकोने ११व्या मिनिटाला एकमेव गोल केला. जर्मनासठी बेन हॅशने आठव्या व ३०व्या मिनिटाला दोन, तर पॉल ग्लेंडर व फ्लोरीन स्पेर्लिंग यांनी अनुक्रमे ४१ आणि ५८व्या मिनिटाला एकेक गोल नोंदवून जर्मनीचा विजय साकारला. अंतिम फेरीत जर्मनीची शनिवारी फ्रान्सशी गाठ पडेल. फ्रान्सने दुसऱ्या उपांत्य सामन्यात स्पेनला ३-१ असे नमवले.

आता कांस्यपदकासाठी भारताची लढत

उपांत्य फेरीत पराभूत झाल्याने भारतीय संघ आता कांस्यपदकासाठी भिडणार आहे. फ्रान्स व स्पेन यांच्यातील पराभूत संघासोबत भारताची गाठ पडेल. भारताने २००१ मध्ये (होबार्ट) व २०१६ मध्ये (लखनौ) ज्युनियर हॉकी विश्वचषकाचे विजेतेपद पटकाविले होते. याचबरोबर १९९७ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या स्पर्धेत भारताला उपविजेतेपद मिळाले होते. दोन वर्षांपूर्वी भुवनेश्वरमध्ये झालेल्या स्पर्धेत भारताच्या ज्युनियर संघाला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते.

क्रीडा संचालक नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान

डॉ. सचिन शिंदे यांची माहिती

। म्हसळा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ व ऑलिंपिक स्पर्धांमध्ये पदक मिळवण्यासाठी राज्य सरकार खेळाडूंना प्रोत्साहन व अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देत आहे. असे असले तरी मुंबई विद्यापीठातील महाविद्यालयांत खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी क्रीडा संचालक नसल्याने त्याचा फटका मुंबईसह कोकणातील लाखो विद्यार्थ्यांना बसत आहे, असे स्पेडा संघटनेचे अध्यक्ष डॉ. सचिन शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, अश्वमेध क्रीडा स्पर्धा वगळता मुंबई विद्यापीठातील खेळाडू आंतर भारतीय विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये भरीव अशी कामगिरी करू शकले नाहीत, असेही श्री. शिंदे म्हणाले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मुंबई विद्यापीठ सन १८५७ मध्ये स्थापन झालेले असून, महाराष्ट्रातच नव्हे तर भारत देशातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. मुंबई विद्यापीठानंतर महाराष्ट्रात इतर १८ विद्यापीठांची स्थापन झाली. मुंबई विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठांमध्ये यूजीसी रेग्युलेशन २०१० व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार राज्यातील बहुतांशी अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये संचालक शारीरिक शिक्षण व क्रीडा ही पदे निर्माण करून भरलेली आहेत, तर काही महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण अधिव्याख्याता या नावानेदेखील पदे भरण्यात आली आहेत. मात्र, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित १९९ अनुदानित अशासकीय महाविद्यालयांपैकी केवळ ०९ महाविद्यालयांमध्ये ही पदे अस्तिवात आहेत. उर्वरित १९० अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये ती भरलेली नाहीत. परिणामी, येथील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या अनुदानित महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक ही पदे भरण्यात यावीत यासाठी गेली अनेक वर्षे सातत्याने मागणी होत आहे.

मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन कुलसचिव डॉ. बळीराम गायकवाड यांनी राज्य शासनाला दिलेल्या पत्रात महाविद्यालयांतील खेळाचा दर्जा दिवसेंदिवस ढासळत असल्याची चिंता व्यक्त केली होती तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयातील प्रशिक्षित व्यक्ती उपलब्ध नसल्याने महाविद्यालयात शिकणाऱ्या खेळाडू युवा-युवतींची अत्यंत गैरसोय होत असून, खेळाडूंची निवड करणे, संघ तयार करणे, प्रशिक्षण,मार्गदर्शन, आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांसाठी खेळाडू घेऊन जाणे, क्रीडा सोयी सुविधांची निर्मिती व देखभाल, महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे व्यवस्थापन नीट होत नसल्याचे त्यांनी दिलेल्या पत्रात नमूद केले होते.

> महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांप्रमाणे मुंबई विद्यापीठामधील संलग्नित अशासकीय महाविद्यालयांमध्ये संचालक शारीरीक शिक्षण आणि क्रीडा हे पद त्वरित भरण्यात यावेत. यामुळे पात्रताधारकांना नोकरीची संधी उपलब्ध होईल व मुंबईसह कोकणातील लाखो खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाल्याने चांगले खेळाडू निर्माण होतील.
> - डॉ सचिन शिंदे, अध्यक्ष, स्पेडा

पॉवरलिफ्टिंगमध्ये कुणालला सुवर्ण

। पाताळगंगा । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील घोडीवली येथील कुणाल पिंगळे याने एशियन पॉवरलिफ्टिंग आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. भारताचे प्रतिनिधित्व करताना ५३ किलो वजनी गटात केलेल्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सदर स्पर्धा १० ते १८ डिसेंबर या कालावधीत बहारू (मलेशिया) या ठिकाणी सुरू असून, त्याने पटकविलेले सुवर्णपदक रायगड जिल्ह्यासह भारतवासियांसाठी मान उंचवणारे ठरले आहे. यामुळे कुणाल पिंगळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्याच्या या विक्रमाने खालापूर तालुक्याच्या नावलौकिकात भर पडली आहे.

दरम्यान, जिम संचालक प्रतीक लोखंडे (खोपोली) यांचे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, उपाध्यक्ष श्रीनिवास भाटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव तसेच दत्तात्रेय मोरे, माधव पंडित, संदीप पाटकर, सुभाष टेंबे, मानस कुंटे, राहुल गजरमल यांनी अभिनंदन केले आहे. तर संघटनेचे सचिव अरुण पाटकर यांनी कुणाल हा रायगड जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय पदक विजेता पाचवा खेळाडू असल्याचे सांगितले.

७ नंबर जर्सीचा वारसदार फक्त धोनीच!

बीसीसीआयचा मोठा निर्णय; खेळाडूंना दिली सूचना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताचा सर्वात यशस्वी कर्णधार महेंद्रसिंह धोनीची नंबर ७ जर्सी यापुढे इतर कोणत्याही भारतीय खेळाडूला उपलब्ध होणार नाही. धोनीच्या आंतरराष्ट्रीय निवृत्तीनंतर सुमारे तीन वर्षांनी बीसीसीआयने हा निर्णय घेतला. धोनीने त्याच्या संपूर्ण कारकीर्दीत त्याच्या टी-शर्टवर घातलेला नंबर निवृत्त करण्याचा निर्णय घेतला आहे, असं बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे.

धोनीचा जर्सी क्रमांक ७ आता निवृत्त होत आहे. बीसीसीआयने खेळाडूंना त्यांचा जर्सी क्रमांक निवडताना तो ७ निवडू नये अशी सूचना केली आहे. बीसीसीआयने हा निर्णय धोनीने भारतीय क्रिकेटसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्याच्या सन्मानार्थ हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे.

भारतीय क्रिकेट बोर्डाने सचिन तेंडुलकरचा जर्सी क्रमांक १० हादेखील यापूर्वीच निवृत्त केला आहे. आता धोनीचा जर्सी क्रमांक ७ देखील निवृत्त करून धोनीच्या एकमेवाद्वितीयत्वावर शिक्कामोर्तब केलं.

बीसीसीआय अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, 'सध्याच्या घडीला भारतीय संघातील खेळाडू जवळपास ६० क्रमांक वापरत आहे. जरी एखादा खेळाडू वर्षभर किंवा त्यापेक्षा जास्त काळ संघाबाहेर असला तरी त्याचा जर्सी क्रमांक दुसऱ्या नव्या खेळाडूला दिला जात नाही. त्यामुळे नव्या खेळाडूंना फक्त ३० क्रमांकातूनच नंबर निवडायचा असतो.'

रोहित-विराटचा नंबर किती?

सध्याच्या भारतीय खेळाडूंमध्ये विराट कोहली १८ क्रमांकाचा टी-शर्ट घालतो आणि रोहित शर्मा ४५ क्रमांकाचा टी-शर्ट घालतो. जो सध्या क्रिकेट चाहत्यांमध्ये सर्वात लोकप्रिय टी-शर्ट नंबर आहे.

शार्दुलच्या जर्सीवरुन वाद

२०१७मध्ये मुंबईचा वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरने १० नंबर परिधान करून मैदानात प्रवेश केला होता. यानंतर चाहत्यांनी त्याला सोशल मीडियावर ट्रोल केले. काही चाहत्यांनी असेही सांगितले की, शार्दुल सचिन बनण्याचा प्रयत्न करत आहे. यावर रोहितने शार्दुलची खिल्लीही उडवली होती. यानंतर बीसीसीआयने हस्तक्षेप केल्यानंतर ठाकूर यांनी ५४ नंबरचा टी-शर्ट परिधान केला.

१० आणि ७ क्रमांकाचा क्रेझ

जर्सी क्रमांक १० आणि जर्सी क्रमांक ७ याबाबत फुटबॉलपाठोपाठ क्रिकेटमध्येदेखील मोठी क्रेज पहायला मिळते. फुटबॉलमध्ये सध्या खेळत असलेल्या लिओनेल मेस्सीचा जर्सी क्रमांक हा १० आहे, तर ख्रिस्तियानो रोनाल्डोचा जर्सी क्रमांक हा ७ आहे. यापूर्वी झिदान, ब्राझीलचा रोनाल्डिन्हो यांनीदेखील जर्सी क्रमांक १० होता. इंग्लंडचा स्टार फुटबॉलपटू डेव्हिड बेकहमचादेखील जर्सी क्रमांक हा ७ होता. त्यानेच या जर्सी क्रमांकाला ग्लॅमर मिळवून दिलं होतं.

प्राणी कसे बदलतात रंग?

सरडा रंग बदलतो तर काही सजीव आपल्या रंगामुळे निसर्गात अगदी सहज मिसळून जातात. काही फुलपाखरांचे पंख पानांसारखे वाटतात. त्यांच्या शिराही पानांवरच्या रेषांप्रमाणे दिसतात. यामुळे झाडाच्या खोडावर फुलपाखरू बसलं आहे हे पटकन लक्षात येत नाही. यामुळे शत्रूपासून त्यांचा बचाव होतो. झाडावर राहणाऱ्या बेडकांच्या काही प्रजाती रंग बदलतात. आता रंगबदलाची ही प्रक्रिया नेमकी काय आहे हे जाणून घेऊया. प्रत्येक सजीवाच्या शरीरात पेशी असतात. हृदय, फुफ्फुसासारखे अवयव आणि आपली त्वचाही याच पेशींपासून बनली आहे. यातल्या काही पेशींना मेलानोफोर असं म्हटलं जातं. या पेशींमध्ये रंगद्रव्यं असतात. त्याला पिगमेंट्स असं म्हटलं जातं. यामुळे त्वचेला रंग प्राप्त होतो. हिरव्या रंगाच्या पालींच्या शरीरात हिरवं रंगद्रव्य असतं. त्यामुळे त्यांना हिरवा रंग मिळतो. या पेशींवर मज्जासंस्थेचं नियंत्रण असतं. त्यामुळे गरजेनुसार पिगमेंट्सच्या संचयात बदल घडत जातात. रंगांमध्ये होणाऱ्या या बदलाला अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. वातावरणातला प्रकाश, तापमान, भीती किंवा धोक्याची जाणीव यामुळे पिगमेंट्सवर परिणाम होतो. यानुसारच सरडा तसंच इतर प्राण्यांमध्ये रंगबदलाची प्रक्रिया घडते.

वाचा तर खरं

तुम्हालाही इग्लूमध्ये राहायचंय?

बर्फाच्या घराला इग्लू म्हणतात हे तुम्ही शिकला असाल. भरपूर बर्फ पडणाऱ्या आणि तापमान शून्यापेक्षा कमी असणाऱ्या प्रदेशातील लोक अशा बर्फाच्या घरांमध्ये राहतात. बर्फ हा उष्णतेचा खराब वाहक असल्यामुळे कडाक्याच्या थंडीतही या घरांमध्ये तापमान स्थिर राहते आणि बाहेरच्या तुलनेत आत कमी थंडी जाणवते. ही घरे घुमटाच्या आकाराची असून त्यात प्रवेश करण्यासाठी तसेच बाहेर पडण्यासाठी एक अरुंद दरवाजा असतो. अरुंद दरवाजामुळे बाहेरून थंडी आत येत नाही आणि आतील उष्णता बाहेर जाऊ शकत नाही.

तुम्हालाही बर्फाच्या घरात राहायचे आहे का? घाबरु नका मित्रांनो, त्यासाठी आपल्याला सायबेरियात जाण्याची काहीच गरज नाही. तुम्ही भारतातही याचा आनंद घेऊ शकता. हिमाचलमधील मनालीजवळील सेथान या गावात स्थानिक रहिवासी हिवाळ्यात अशीच बर्फाची घरे बांधतात. सेथान मनालीपासून अवघ्या १४ किमी अंतरावर आहे. हिवाळ्यात येथे खूप बर्फ पडतो. अशा परिस्थितीत स्थानिक रहिवासी बर्फाची घरे म्हणजेच इग्लू बांधतात. ही बर्फाची घरे पर्यटकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत.

या घरांच्या भिंती केवळ बर्फाच्याच नसतात तर त्यातील पलंगही बर्फाचा असतो. मात्र विशिष्ट पद्धतीने ठेवला जात असल्यामुळे तो उबदार राहतो आणि झोपणाऱ्याला अजिबात थंडी जाणवत नाही. या प्रकारे खुर्च्या आणि टेबलदेखील बर्फापासून बनवलेले जातात. ते इतके आरामदायी असतात की त्यावर बसून अन्न खाल्ले जाते. त्यामुळे हिवाळा आणि बर्फाचा आनंद घेण्यासाठी इथे पर्यटक मोठी गर्दी करताना दिसतात.

पूर्वी सेथानचा हा प्रदेश हिवाळ्यात बाहेरच्या जगापासून पूर्णपणे दूर होत असे. स्थानिक नागरिकही घरे बंद करून मनालीत येत असत. पण काही काळानंतर मात्र स्थानिक रहिवाशांनी इग्लू बांधण्यास सुरुवात केली. यामुळे स्थानिक रहिवाशांची सोय होऊ लागलीच खेरीज इथले पर्यटनही वाढू लागले. आता इग्लूमुळे हा भाग पर्यटनाच्या नकाशावर आला आहे. भर थंडीमध्ये येथील रहिवाशांना चांगला रोजगार मिळत आहे.

भटकंती

चुकांमधून शिका...

मित्रांनो, तुमच्या हातून चुका झाल्यास काय होते बरं? शिक्षक वा पालक तुम्हाला रागवतात आणि पुन्हा अशी चूक न करण्याबाबत तंबी देतात ना...? अशा रागवण्यामुळे तुम्हाला त्यांची भीती वाटते आणि हातून अधिकच चुका होतात... बरोबर की नाही...! पण मुलांनो, प्रत्येकाकडून चुका होतच असतात हे आधी समजून घ्या. त्यातही लहान वयात चुका होणारच... मात्र एक चूक पुन्हा करु नका याची काळजी घ्या आणि प्रत्येक चुकीतून मिळालेले शहाणपण आयुष्यभर जपा. कारण प्रत्येक चूक तुमच्यासाठी फायदेशीरच ठरत असते.

लक्षात घ्या

मंडळी, चूक न करण्यामध्ये शहाणपण असतेच पण तर चुका केल्यानंतर ती कबुल करुन आपण आपली ओळख कशी राखतो, स्वत:त काय बदल घडवून आणतो हे जाणून घेणेदेखील महत्त्वाचे असते. आपला स्वभाव लवचिक असेल तितक्या लवकर आपण चुका स्वीकारू आणि शिकत पुढे जाऊ. खेरीज लहान असताना एखादी चूक केल्याने कमी त्रास होतो आणि त्यातून शिकत पुढे गेल्याने आपली लवकर प्रगती होते. म्हणूनच चुकाची कबुली द्या. त्या लपवणे चुकीचे आहे.

काळजी करणे आणि विचार करणे यात खूप फरक आहे. बुद्धिमत्ता ही माणसाची सर्वात मोठी संपत्ती आहे. विचार आपल्याला वेगळी ओळख देतात. पण अनेक वेळा आपण विचार करण्याऐवजी काळजी करू लागतो. हे चुकीचे आहे. काळजी केल्याने काम पूर्ण होण्यास मदत होते, परंतु यश मिळत नाही. उलटपक्षी विचार करून आपण पुढे जातो आणि नवीन गोष्टी साध्य करतो. शिवाय विचारांच्या शक्तीला मर्यादा नसते. ती अमर्याद आहे. म्हणूनच काळजी न करता चांगला विचार करा आणि पुढे जा. कधीकधी सर्वात वाईट काळातही तुम्हाला सर्वोत्तम काम करावे लागते. अशावेळी अजिबात घाबरु नका. मानसिक कणखरपणा तुम्ही त्या स्थितीतूनही बाहेर पडू शकता.

साधं सोपं ग्रीटिंग कार्ड

दोस्तांनो, निसर्गातल्या पाना-फुलांचा वापर करून तुम्ही छान कलाकृती तयार करू शकता. वाळलेल्या पानांपासून ग्रीटिंग तयार करून भेट म्हणून देऊ शकता. हे ग्रीटिंग अगदी सोप्या पद्धतीने तयार करता येईल. मग काय, चला लागू या कामाला....

साहित्य: वाळलेली पानं, स्टेशनरी कार्ड आणि एन्व्हलप, गम

कृती: वेगवेगळ्या आकारांची वाळलेली पानं घ्या. स्टेशनरी जमवा. पानाच्या मागच्या बाजूला गम लावा. आता तुम्ही आणलेल्या ग्रीटिंग कार्डच्या पुढच्या बाजूवर हे पान चिकटवा. आडवं, उभं किंवा तिरकं... योग्य वाटेल तसं पान चिकटवा. पान नीट चिकटवून घ्या. गम वाळू द्या. आतल्या बाजूला संदेश लिहा. सजावटीच्या वस्तूंचा वापर करून ग्रीटिंग सजवा. यासाठी वाळलेल्या फुलांचाही वापर करता येईल. हे अनोखं ग्रीटिंग कार्ड मित्रमंडळी, कुटुंबियांना भेट द्या.

करून तर पहा

ऑडियॉलॉजीच्या क्षेत्रात

ऐकण्याची क्षमता, संतुलन आणि कानांशी संबंधित विकारांविषयी ऑडियोलॉजीमध्ये शिकता येतं. ऑडियॉलॉजी हे कानांशी संबंधित विकारांचं विज्ञान आहे. ऐकण्याच्या क्षमतेचा अभ्यास म्हणजे ऑडियॉलॉजी. या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना ऑडियॉलॉजिस्ट असं म्हटलं जातं. सध्या ध्वनिप्रदुषणात प्रचंड वाढ झाली आहे. लोकांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे ऑडियॉलॉजिस्टची गरज वाढू लागली आहे. ऑडियॉलॉजिस्ट ऐकण्याची किंवा बोलण्याची समस्या असलेल्या रुग्णांसोबत काम करतात. नाक, कान, घसा तज्ज्ञांसोबत ते काम करू शकतात. शैक्षणिक संस्था तसंच एनजीओंमध्येही ते काम करतात. ऑडियॉलॉजिस्ट बनण्यासाठी विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. बीएससी तसंच एमएससी इन ऑडियॉलॉजी असे अभ्यासक्रम भारतातल्या काही संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. ऑडियॉलॉजिस्टला जबाबदारीने वागावं लागतं. समोरच्याला समजून घेण्याचं कौशल्य त्याच्याकडे असावं लागतं. संवादकौशल्य असणंही गरजेचं मानलं गेलं आहे. ऑडियॉलॉजिस्टला सुरुवातीला २५ ते ३० हजारांचं उत्पन्न मिळतं. अनुभव वाढल्यानंतर उत्पन्नही वाढतं. या क्षेत्रात काम करायचं तर तुमच्याकडे सामाजिक दृष्टिकोन असणं गरजेचं असतं.

कोण होणार?

काम होईल सोपे

मुलांनो, आई-बाबा तुम्हाला घरातील काही कामे शिकवत असतील. कधी कधी तुम्हाला स्वत:ची डिश घासण्यास सांगितले जात असेल. सोबतच पाण्याची भांडी, कपबशा वा अशी छोटी छोटी भांडी स्वच्छ करण्याचे कामही कधी कधी तुम्हाला करावे लागत असेल. एरवी तुम्ही ते सहज करतही असाल. पण हिवाळ्यात मात्र हे काम अगदी नकोसे होते. थंड पाण्यात हात गारठतात. मात्र घाबरु नका. यावरही उपाय आहे. थंडीतही कोणताही त्रास न होऊ देता हे काम करायचे असेल तर हातमोजे वापरा.हा एक चांगला पर्याय आहे की नाही! यामुळे हाताला गार पाण्याचा स्पर्शही होणार नाही आणि भांडी स्वच्छ केल्यानंतरही हातांचा मऊपणा कायम राहण्यास मदत होईल. हातमोजे घालून भांडी घासण्याचे काम केल्यास त्याच्या कठीण कडा लागणे, काच लागणे, पावडरमुळे रॅश येणे आदी धोकेही कमी होतात आणि स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने तुम्ही अगदी सहजतेने हे काम शिकू शकता.

दुसरा एक मार्ग आहे तो भांडी स्वच्छ करण्यासाठी गरम पाणी वापरण्याचा. म्हणजेच तुम्ही आधी भांडी गरम पाण्यात भिजवून ठेवा. काही वेळाने अगदी हलका स्पंज फिरवला तरी ती स्वच्छ होतील. समजा कुकिंग शिकत असताना तुमच्याकडून एखादे भांडे जळले वा जास्त खराब झाले तर आता आई रागवेल... या विचाराने घाबरु नका. अशा परिस्थितीत आपण मीठाच्या मदतीने भांडी सहजपणे चमकवू शकतो. त्यासाठी स्क्रब पॅडवर मीठ आणि डिश वॉश लावून खराब झालेले भांडे घासून घ्या. झाले की नाही काम!

विचार करा

ॲपवर करा जखमेची देखरेख

दोस्तांनो, जखम झाली की आपल्याला डॉक्टरांकडे जावं लागतं. मलमपट्टी करून घ्यावी लागते. जखमेकडे दुर्लक्ष केलं तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा वेळी एखाद्या ॲपवरून तुम्हाला मदत मिळाली तर? काम बरंच सोपं होईल ना! असंच एक ॲप तयार करण्यात आलं आहे. या ॲपच्या मदतीने जखमेची देखरेख आणि उपचार करता येणार आहेत. 'वाउंड केअर' असं या ॲपचं नाव आहे. युनिव्हर्सिटी ऑफ विस्कॉन्सिनमधल्या शास्त्रज्ञांनी हे अनोखं ॲप तयार केलं आहे. मध्यंतरी त्याची चाचणी घेण्यात आली. या ॲपवर जखमेचे फोटो अपलोड केल्यानंतर डॉक्टर तसंच नर्सकडून विविध प्रश्न विचारले जातात. लक्षणांवरून उपचार सांगितले जातात. जखमेत जंतूसंसर्ग होऊ नये म्हणूनही उपचार सांगितले जातात. हे ॲप अगदी सोप्या पद्धतीने वापरता येईल, असं लोकांना वाटतं. या ॲपमुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल होण्याची गरज भासणार नाही. त्याच्यावर घरच्या घरी उपचार होऊ शकतील. पण यासाठी डॉक्टर आणि नर्स यांना बराच वेळ काढावा लागणार आहे. त्यामुळे या ॲपमध्ये थोडेफार बदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



ॲप वर्ल्ड

ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) 'वन बेल्ट वन रोड' हा कोणत्या देशाचा प्रकल्प आहे?
२) महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावांचा विक्रम करणारी महिला कोण?
३) भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त कोण आहेत?
४) ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू कोण?
५) क्युबाची राजधानी कोणती?
६) वेस्ट बँक एरिया कुठल्या देशात आहे?
७) यंदाची युवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा कुठे पार पडली?
८) गोल्डन बॉय असं कोणत्या खेळाडूला म्हटलं जातं?
९) लोखंडाचा सर्वात शुद्ध प्रकार कोणता?
१०) जंबूघोडा राष्ट्रीय उद्यान कोणत्या राज्यात आहे?

उत्तर: १) चीन २) मिताली राज ३) राजीव कुमार ४) सायना नेहवाल ५) हवाना ६) इस्राएल ७) जर्मनी ८) पंकज अडवाणी ९) रॉट आयर्न १०) गुजरात

चित्र रंगवा

स्मार्टफोन हाताळा स्मार्टली...

मित्रांनो, आपण सगळेच स्मार्ट फोन वा अन्य डिव्हाइस वापरतो. मात्र त्यातील माहिती सुरक्षित राहावी, याची काळजी घेणेही महत्त्वाचे असल्याचे तुम्ही जाणता. कधी कधी त्यात व्हायरस शिरतो. मुलांनो, हे एक प्रकारचे मालवेअर असून ते स्वत:ला नवीन रूप देण्यात पटाईत असते. अगदी रक्तबीज या राक्षसाप्रमाणेच ते काम करते. एकदा सिस्टममध्ये प्रवेश केल्यानंतर, त्यांची संख्या वाढतच जाते आणि बघता बघता ते संपूर्ण प्रणालीमध्ये पसरुन भरपूर नुकसान करतात. याच्या मदतीने हॅकर्स तुमच्या संपूर्ण सिस्टीमचा डेटा घेऊ शकतात, इतकेच नव्हे तर तुमची सिस्टीमसुद्धा ताब्यात घेऊ शकतात. सहाजिकच याचा गैरवापर होण्याचा मोठा धोका असतो. म्हणूनच फोनमध्ये व्हायरस आहे का? हे शोधणे महत्त्वाचे असते.

समजा तुमच्या फोनमध्ये मालवेअर असेल तर गुगल तुम्हाला अलर्टही पाठवते. फोनमध्ये अनेक वेळा पॉपअप नोटिफिकेशन्स दिसल्या तर मालवेअर असल्याचे तुम्ही ओळखू शकता. फोनचा वेग अचानक कमी होणे हे देखील मालवेअर असल्याचे लक्षण आहे. अचानक फोनचे स्टोरेज भरल्यासही तुम्ही सतर्क राहणे आवश्यक आहे. फोनचा ब्राउझर तुम्हाला काही अज्ञात साइटवर वारंवार नेत असल्यासही तुम्ही सावध व्हायला हवे. महत्त्वाचे म्हणजे तुम्ही पाठवले नसलेले मेसेज कुटुंबातील लोकांना येऊ लागल्यास फोनमध्ये व्हायरस असल्याचे ओळखा.

मित्रांनो, आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, हे व्हायरस फोनमध्ये कसे पोहोचतात. मंडळी, अज्ञात लिंक्सवर क्लिक केल्यास व्हायरस फोनमध्ये शिरतो. बरेचदा अशा लिंक मेल, व्हॉट्सॲप किंवा मेसेजद्वारे पाठवल्या जातात. तुम्ही या लिंकवर क्लिक करता तेव्हा एक साइट उघडते आणि व्हायरस फोनमध्ये पोहोचतात. या व्यतिरिक्त कोणत्याही स्टोअरमधून ॲप डाउनलोड केल्यावर देखील हा धोका वाढतो. हॉटेल, विमानतळ, रेल्वे स्थानक आणि बस स्टँड यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी फोन वाय-फायशी कनेक्ट केल्यास फोनमध्ये मालवेअर शिरु शकतात. म्हणूनच काळजी घ्या आणि तुमचा स्मार्टफोन स्मार्टली हाताळा.

टेक्नो टॉक

ठिपके जुळवा

दोस्त हे मस्त

कांगारू रॅट

कांगारू रॅट नावाचा एक प्राणी आहे. शरीराचं संतुलन टिकवून ठेवण्यासाठी तो आपल्या शेपटीचा वापर करतो. इतर उंदरांप्रमाणे हा प्राणी चार पायांवर धावत नाही तर दोन पायांवर उड्या मारतो. झाडाझुडुपांमधून तो अन्न शोधत फिरतो. कांगारूही असंच करतात. म्हणून त्याला कांगारू रॅट असं म्हटलं जातं. कांगारू रॅटला पाण्याची फारशी गरज नसते. या वैशिष्ट्यामुळे तो वेगळा ठरतो.

खादाडी

चविष्ट चाउमीन

नूडल्स किंवा चाउमीन हा प्रकार तुम्हा मुलांना आवडतो. हा पदार्थ बनवण्यासाठी नूडल्स किंवा चाउनमीन, कोबी, गाजर, फरसबी, मटार, भोपळी मिरची अशा भाज्या, लसूण, मीठ, सोया सॉस हे साहित्य घ्या. सर्वात आधी नूडल्स उकडून घ्या. थंड करण्यासाठी ताटात किंवा चाळणीत पसरवून ठेवा. या नूडल्सना थोडं तेल लावा. आता भाज्या चिरून घ्या. सगळ्या भाज्या कढईत घालून शिजवून घ्या. भाज्या फार शिजवू नका. यात लसून घालून शिजवा. आता त्यात मीठ आणि नूडल्स घाला. हलवून घ्या. वरून सोया सॉस घाला.

लाईफस्टाईल

प्लास्टिक स्ट्रॉ आहे घातक!

शीतपेय किंवा ज्यूस पिण्यासाठी आपण स्ट्रॉचा वापर करतो. या स्ट्रॉ प्लॅस्टिकपासून तयार केलेल्या असतात. हे प्लास्टिक आपल्यासाठी घातक ठरू शकतं. प्लास्टिक स्ट्रॉमध्ये पॉलीइथाइलीन हा घटक असतो. यामुळे आपल्याला बरेच विकार होऊ शकतात. त्यामुळे स्ट्रॉचा वापर करताना दहा वेळा विचार करा.

योगा टाईम

डोकेदुखीवर प्रभावी उपाय

डोकं दुखायला लागलं की खूप अस्वस्थ वाटतं. डोकेदुखीवर नियंत्रण मिळवायचं असेल तर महाशीर्ष मुद्रा करता येईल. हे आसन करण्यासाठी मांडी घालून बसा. करंगळीच्या बाजूचं बोट आंगठ्याच्या खालच्या बाजूला टेकवा. यानंतर करंगळी, मधलं बोट यांचा वरचा भाग अंगठ्याच्या वरच्या भागाला चिकटवा. दिवसातून तीन वेळा ही मुद्रा करा.

कलासक्त

दिलीपकुमार नावाचा

मुगले आझम

अभिनय हे मेहनतीचे काम आहे. गाण्याप्रमाणेच त्याचाही रियाज करावा लागतो. त्यासाठी वाचन, मनन, चिंतनही करावे लागते आणि सदैव अंतर्मुख असावे लागते. चमच्यांच्या गोतावळ्यात राहून, पार्ट्या करून व प्रसिद्धीत राहून अभिनेता म्हणून सिद्ध होता येत नाही. फैजचे काव्य, गालिबच्या गजला आणि कीट्स व टेनिसनच्या रचनांत रमणारा दिलीपकुमार नावाचा मुगले आझम शतकातून एखादाच होतो

बाबू मोशाय

लॉरेन्स ऑलिव्हिए, जॉन गिलगुड, राल्फ रिचर्डसन हे हॉलिवूडमधील श्रेष्ठ दर्जाचे अभिनेते गणले जातात. भारतीय चित्रपटसृष्टीतील श्रेष्ठ अभिनेत्यांमध्ये निःसंशयपणे दिलीपकुमारचा समावेश करावा लागेल. मी येथे 'दिलीपकुमार' असा एकेरी उल्लेख केला, कारण नट व खेळाडू यांची आपल्याशी भावनिक जवळीक असते. तेव्हा एकेरी उल्लेखात अधिक्षेप नसून, आपुलकीच आहे. अभिनयातील आब, अदब, सूक्ष्मता, संवेदनशीलता आणि एकूणच प्रगल्भता व सुसंस्कृतता याबद्दल दिलीपकुमारशी कोणाचीच तुलना नाही. अलीकडील काळात त्याचा वाढदिवस चित्रपटसृष्टीतील अव्वल कलाकार मंडळींच्या उपस्थितीत झाला, त्यास धर्मेंद्र, महानायक अमिताभ बच्चन, सुभाष घई, राजकुमार हिराणी, प्रियांका चोप्रा, अनिल कपूरपासून सर्वजण होते. त्या कार्यक्रमात गीतकार जावेद अख्तर यांनी दिलीपकुमारचे ज्या रीतीने कौतुक केले, ते ऐकताना त्याची बेगम सायराबानोही मंत्रमुग्ध झाली आणि जावेद काय बोलत आहेत, ते ती दिलीपकुमारना सांगत होती. कारण मागच्या काही वर्षांपासून त्यांची प्रकृती बरी नसते आणि दर चार-सहा महिन्यांनी लीलावती इस्पितळाच्या वाऱ्या कराव्या लागतात. दोन-चार वर्षांपूर्वी अमिताभ, आमिर, शाहरुख, सलमान, करीना प्रभृती सर्व महत्त्वाचे कलावंत दिलीपकुमारच्या निवासस्थानी गेले व तेथे त्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा केला होता. दिलीपकुमारच्या पिढीतल्याच नव्हे, तर नंतरच्या पिढ्यांमधील बहुतेक नायक, नायिका, खलनायक, चरित्र अभिनेत्यांनी त्याच्यापेक्षा खूप जास्त चित्रपटांमध्ये अभिनय केला आहे. त्या तुलनेत दिलीपकुमारच्या चित्रपटाची संख्या ७०-८०च्या पलीकडे नाही. पण गुणवत्तेच्या कसोटीवर आपण त्यांच्या पासंगालाही पुरणार नाही, असे अगदी नव्या पिढीतील कलाकारांचेही मत आहे. मला आठवते, 'कर्मा'च्या वेळी नसीरुद्दीन शाह म्हणाला होता की, हा तद्दन व्यावसायिक चित्रपट मी करतो आहे, त्याचे एकमेव कारण म्हणजे दिलीपकुमार! 'शहीद' हा दिलीपकुमारचा चित्रपट बघून धर्मेंद्र कमालीचा प्रभावित झाला होता आणि त्या क्षणापासूनच त्याने सिनेमात जाण्याचे मनावर घेतले. दिलीपकुमारनेही त्याच्यावरधाकट्या भावाप्रमाणे प्रेम केले. दिलीपकुमार हा अभिनयातला शेवटचा शब्द आहे, असे धर्मेंद्रला प्रमाणिकपणे वाटते आणि ते त्याने अनेकदा बोलूनही दाखवले आहे. दरवर्षी दिलीपकुमारला वाढदिवसाच्या दिवशी भेटण्याचे त्याचे व्रत सुरू आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीचा इतिहास मराठीत प्रथमच कथन करणारे 'चित्राची गोष्ट' हे पुस्तक मी लिहिले होते. त्याचा प्रकाशन समारंभ जेव्हा मुंबईत विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघात पार पडला, तेव्हा त्यास प्रमुख पाहुणे म्हणून दिलीपकुमार उपस्थित होता. जब्बार पटेल व विजय तेंडुलकरही उपस्थित होते. तेव्हा क्रीम कलरचा पठाणी सूट परिधान करून दिलीपकुमार आला होता. त्यावेळी 'फायर' या चित्रपटास समर्थन दिल्यामुळे दिलीपकुमार वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. त्याच्या घरासमोर हिंदुत्ववाद्यांनी अर्धनग्नावस्थेत निदर्शने केली होती. त्यामुळे पोलीस संरक्षण देण्यात आले होते. दिलीपकुमार आला आणि त्याने आपल्या बालपणी आजी गोष्टी कशा साभिनय सांगत असे, त्याच्या आठवणी सांगून उपस्थितांना अक्षरशः संमोहित केले. चित्रपटांबद्दल संशोधन व उत्खनन करून दुर्मिळ इतिहास विश्लेषक पद्धतीने लिहिल्याबद्दल, त्याने माझे अभिनंदन केले. माझ्याशी अनौपचारिक गप्पा मारताना त्याने त्यातील बारीकसारीक तपशिलांबद्दल चर्चा केली. वीसेक वर्षांपूर्वीची ही गोष्ट. तेव्हा माझ्या लक्षात आले की, चित्रपट या माध्यमाच्याच तो विलक्षण प्रेमात आहे! उत्पल दत्त, श्रीराम लागू, अमोल पालेकर, नसीरुद्दीन शाह यांनी रंगभूमी गाजवली व मग ते चित्रपटांत आले. दिलीपकुमार थेट आला तो चित्रपटात आणि ते देखील योगायोगाने. परंतु देवळाली, पुणे, मुंबई इथे त्याने तरुणपणी भरपूर हॉलिवूडपट पाहिले. त्यावेळी आपल्याकडील चित्रपट अभिनय कृत्रिम, नाटकी व बटबटीत असे. दिलपकुमारला नेहमीच संयत अभिनयाचे आकर्षण आहे. दिलीपचा मोठा भाऊ अयूब याच्याकडे चार्ल्स डिकन्स, बर्नार्ड शॉ, शेक्सपिअर, मोपासाँ यांची अनेक पुस्तके होती. यूसुफ ऊर्फ दिलीपकुमारने ती वाचण्याचा सपाटाच लावला. अगदी कार्ल मार्क्सही अभ्यासला. कुराणही त्याला तोंडपाठ होते. मुंबईत यूसुफ अंजुमन इस्लामम या शाळेत (टाइम्स ऑफ इंडियाच्या शेजारची) शिकला. तेथे मुक्री हा त्याचा सहाध्यायी होता. गणितात यूसुफ प्रवीण होता आणि फुटबॉलमध्येही पारंगत. यूसुफने चित्रपटसृष्टीत प्रवेश केला, तो बाँबे टॉकीजमधून. मला कथापटकथा विभागात काम करायचे आहे, असे त्याने सांगितले. विख्यात लेखक पंडित नरेंद्र शर्मा तसेच भगवतीचरण वर्मा तेथे काम करत होते. सुशिक्षित लोकांनाच तेथे बाँबे टॉकीजमध्ये घेत असत. 'ज्वारभाटा' या पहिल्या चित्रपटात दिलीपकुमारचे दिग्दर्शक होते अमिया चक्रवर्ती आणि नायिका होती मृदुला. तेव्हा दिलीप बुजरा होता आणि त्यामुळे नायिकेला मिठी मारण्याच्या दृश्यात काम करताना त्याचे हात थरथर कापू लागले. सेट सोडून तो पळून जाऊ लागला. तेव्हा अमियाजींनी सेटवरच त्याचे पाय बांधून ठेवले...रवींद्रनाथ ठाकूर यांच्या कादंबरीवरील चित्रपटातील प्रमुख भूमिकेसाठी अभी भट्टाचार्यला घेण्यात आले होते. मात्र त्याला हिंदी उच्चार जमेनात. तेव्हा दिग्दर्शक नितीन बोस यांनी त्या जागी दिलीपकुमारला घेतले. 'मिलन'मधील दिलीपच्या कामाचे 'फिल्म इंडिया'चे संपादक बाबूराव पटेल यांनीही कौतुक केले. 'जुगनू'मध्ये दिलीपकुमारने नूरजहाँसम वेत काम केले. मात्र त्यावर मुंबईचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी काही काळ बंदी घातली होती. हा चित्रपट व ही जोडी लोकप्रिय झाली. नलिनी जयवंत व नर्गिससमवेतच्या 'अनोखा प्यार'मध्ये दिलीपने शोकात्म प्रसंगात केलेल्या अभिनयामुळे त्याला ट्रॅजेडी किंग असा किताब मिळाला. फिल्मिस्तानच्या 'शहीद' चित्रपटात चंद्रमोहन व दिलीप यांच्या अभिनयाची जुगलबंदी पाहायला मिळते. कोर्टातील दिलीपकुमारचा अभिनय आणि आपल्या मुलाची बाजू लावून धरताना चंद्रमोहनने केलेला जबरदस्त युक्तिवाद हा बघण्यासारखा होता. हा सिनेमा बघूनच धर्मेंद्रला मुंबईच्या रूपेरी सृष्टीत येण्याचे आकर्षण निर्माण झाले. 'घर की इज़्ज़त'मध्ये आपले दुःख विसरण्यासाठी एकच प्यालात बुडालेल्या व्यसनी नायकाची भूमिका दिलीपने केली. दिलीपकुमारचा 'आरज़ू' हा एक महत्त्वाचा चित्रपट. एमिली ब्रॉंटे यांच्या 'विदरिंग हाइट्स' या कादंबरीवर आधारित या चित्रपटाची पटकथा इस्मत चुगताई यांची होती. ज्या मुलीच्या प्रेमात तो पडतो, तिच्याशी त्याचा विवाह होत नाही आणि समाजाकडून तुच्छतेची वागणूक मिळाल्याने तो निराश होतो. 'आरज़ू'तील दिलीपचा अभिनय हृदयस्पर्शी होता. 'अंदाज़'मध्ये दिलीपकुमार नायिका नर्गिसला 'तुम मुझे प्यार करती हो,' असे म्हणतो. पण तरीही ती त्याच्यावर गोळ्या झाडते. हा प्रसंग असंख्य तरुणांच्या मनावर कोरला गेलाय. 'जोगन'मधील भक्ती विरुद्ध वासना या संघर्षात दिलीपकुमारने संवादफेकीत पॉझेसचा फार चांगला वापर केला होता. 'हलचल'मध्ये तर बलराज साहनी आणि याकूबसारख्या कसलेल्या कलावंतांसमोर दिलीपने प्रभावी शोकात्म अभिनय केला. 'तराना'मध्ये दिलीपचा अभिनय बघण्यासाठी मधुबाला त्याच्या जवळ येऊन बसायची. त्यावेळी दोघांमध्ये प्रेमही फुलू लागले होते. 'दाग'मधील व्यसनी शंकरची भूमिका करताना दिलीपच्या तोंडी असलेला एक संवाद अजूनही स्मरणात आहे, तो असा 'दिन में इसकी ज़रूरत होती है'. ज़ालिम रात तो ख़ुद शराब होती है,' असे तो दारूला उद्देशून म्हणतो. 'आन' या पोशाखीपटातही तलवारबाजी, घोडेस्वारी करणाऱ्या आक्रमक नायकाची भूमिका दिलीपने मस्त निभावली. 'दीदार'मध्ये त्याने अंध माणसाची भूमिका केली. ही भूमिका जिवंत व्हावी म्हणून तो बराच काळ अंधांबरोबर घालवत असे. 'इन्सानियत'मध्ये दिलीपकुमार व देव आनंद या दोघांना एकत्र पाहताना, उत्कृष्ट व सामान्य अभिनय यातला फरक लोकांच्या लक्षात आला.

मात्र दिलीपकुमारच्या संपूर्ण कारकिर्दीतील 'देवदास' हा सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणावा लागेल. भूमिकेच्या तयारीसाठी त्याने शरच्चंद्रांची कादंबरी अनेकदा वाचली. दिग्दर्शक बिमल रॉय यांच्यासमवेत अनेकदा चर्चा केली. 'देवदास'चा मानसिक कमकुवतपणा, पारोबद्दलचे त्याचे अपार प्रेम, तिच्या वियोगाचे दुःख आणि आयुष्याबद्दलची व्यर्थता दिलीपकुमारने कमालीच्या सूक्ष्मपणे साकार केली. 'मधुमती'त सैरभैर झालेला नायक त्याने फार परिणामकारकपणे दाखवला. 'आझाद', 'नया दौर' व 'कोहिनूर' मधल्या दिलीपच्या भूमिका ज़िंदादिल नायकाच्या आहेत. 'मुग़ले आझम' या ऐतिहासिक पटात सलीमच्या भूमिकेत आपण दिलीपशिवाय दुसऱ्या कुणाचाच विचार करू शकत नाही. पण सुरुवातीला, या भूमिकेत आपण शोभून दिसणार नाही, असे त्याला वाटत होते. 'गंगा जमना'मध्ये रांगडा नायक ते दरोडेखोर असा प्रवास करताना, 'मुन्ना हम घर आ गए' असे म्हणून तो प्राण सोडतो, तेव्हा प्रेक्षक हलून जातात. माझ्या मते, 'राम और श्याम' हा हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट दुहेरी भूमिका असलेला चित्रपट आहे. त्यातील श्यामच्या भूमिकेतला दिलीप कॉमेडीतही आपण कमी नाही, हे दाखवून देतो. 'लीडर', 'संघर्ष', 'गोपी', 'सगीना माहतो' अशा त्याच्या किती चित्रपटांचा उल्लेख करायचा? 'शक्ती'मध्ये दिलीपकुमार आणि अमिताभ यात कोणाचा अभिनय सरस, अशा चर्चा नव्या-जुन्या पिढीत रंगल्या होत्या. 'मशाल'मधील रस्त्यात पडलेल्या बायकोला इस्पितळात नेण्यासाठी त्याने केलेला 'कोई है..'चा आक्रोश हा काळीज पिळवटून टाकणारा होता. 'कर्मा', 'विधाता', 'सौदागर' व 'दुनिया' हे चित्रपट तर तो चरित्र अभिनेता असूनही, केवळ दिलीपमुळेच पाहावेसे वाटले. अभिनय हे मेहनतीचे काम आहे. गाण्याप्रमाणेच त्याचाही रियाज करावा लागतो. त्यासाठी वाचन, मनन, चिंतनही करावे लागते आणि सदैव अंतर्मुख असावे लागते. चमच्यांच्या गोतावळ्यात राहून, पार्ट्या करून व प्रसिद्धीत राहून अभिनेता म्हणून सिद्ध होता येत नाही. फ़ैज़चे काव्य, गालिबच्या गज़ला आणि कीट्स व टेनिसनच्या रचनांत रमणारा दिलीपकुमार नावाचा मुगले आझम शतकातून एखादाच होतो.

आज तो हयात असता, तर त्याने शंभरीत प्रवेश केला असता! (साभार) ■■

बच्चन कुटुंबात वादळ?

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अभिषेक आणि ऐश्वर्या हे दोघंही लग्नातली अंगठी कायम बोटात ठेवायच्या, अलीकडच्या काळात ती दिसत नाही असंही निरीक्षण काहींनी नोंदवल्याचं या बातमीत म्हंटलंय. यापुढचा ताजा प्रसंग म्हणजे अमिताभ आणि श्वेता बच्चन यांनी ऐश्वर्याला सोशल मिडीया अकाऊंटवर फॉलो करणं बंद केल्याची अफवा सध्या जोरदार चर्चेत आहे. पण फॉलो करत असल्याचे पुरावे नसल्यानं अनफॉलो केले म्हणण्याला अर्थ नाही. हे एवढं टाइम्सच्या बातमीत आहे. माझ्या लक्षात आलेले आणखी दोन प्रसंग आहेत. त्यातली एक तर खूप मोठी घडामोड आहे. गेल्याच महिन्यात अमिताभनं आपली काही संपत्ती श्वेता नंदाच्या नावानं केलीय. म्हणजे बच्चनची संपत्ती वारसा हक्कानं एकट्या अभिषेकची नसणार हे अमिताभनं याद्वारे स्पष्ट केलंय.

गजानन कदम

टाइम्स ऑफ इंडियाच्या 'टाइम्स एंटरटेनमेंटनं'एक धक्कादायक बातमी दिलीय. अभिषेक बच्चन-ऐश्वर्या राय बच्चन वेगळं होण्याच्या अफवा का उठल्यात अशी ही बातमी आहे. अफवा उठण्याला आधार वाटेल असे काही प्रसंगही या बातमीत आहेत. कबड्डी लीगच्या दरम्यान फोटो काढताना हे ऐश्वर्या अभिषेकच्या वागण्यानं बुचकळ्यात पडली. दुसरा प्रसंग आहे नव्या नवेलीसोबतचा. पॅरीस फॅशन वीक दरम्यान नव्या आणि ऐश्वर्या रँपवर चालणार होत्या आणि शेवटी सर्वांचं एकत्र फोटो शूट असतं. पण अभिषेकची भाची नव्या नवेली नंदा हिने ऐश्वर्यासोबतचा फोटो शुटींग टाळलं असं बातमीत म्हंटलंय. या जगप्रसिद्ध फॅशन वीकला जया बच्चन आणि श्वेता नंदासुद्धा हजर होत्या. श्वेतानं नुसतं एकत्र फोटोसेशन टाळलं नाही तर इन्स्टाग्रामवर फोटो टाकताना फक्त ऐश्वर्याची मुलगी आराध्या बच्चन असलेलेच फोटो टाकले. ऐश्वर्याच्या अनेक चाहत्यांनी श्वेताच्या या वागण्यावर टीकाही केलीय. आणखी एक प्रसंग आहे अमिताभच्या वाढदिवसाचा. गेल्या आठवड्यात ऐश्वर्यानं अमिताभ बच्चन यांना शुभेच्छा देताना फक्त बच्चन यांचाच व्हिडीओ पोस्ट केला आणि फॅमिलीतल्या इतरांना क्रॉप करुन टाकलं. याही पेक्षा मोठा प्रसंग म्हणजे ऐश्वर्या रायच्या ५० व्या वाढदिवसाला बच्चन कुटुंबातल्या कुणीही शुभेच्छा देणारी पोस्ट टाकली नाही.पती अभिषेकनंसुद्धा औपचारिकता पूर्ण करावी तशी पोस्ट टाकली आणि या 'ड्राय'पोस्टबद्दल चाहत्यांनी त्याला चांगलंच फैलावर घेतलं. मनिष मल्होत्रानं दिवाळीत एक पार्टी दिली होती. या पार्टीलासुद्धा ऐश्वर्या एकटीच गेल्याचं दिसून आले.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अभिषेक आणि ऐश्वर्या हे दोघंही लग्नातली अंगठी कायम बोटात ठेवायच्या, अलीकडच्या काळात ती दिसत नाही असंही निरीक्षण काहींनी नोंदवल्याचं या बातमीत म्हंटलंय. यापुढचा ताजा प्रसंग म्हणजे अमिताभ आणि श्वेता बच्चन यांनी ऐश्वर्याला सोशल मिडीया अकाऊंटवर फॉलो करणं बंद केल्याची अफवा सध्या जोरदार चर्चेत आहे. पण फॉलो करत असल्याचे पुरावे नसल्यानं अनफॉलो केले म्हणण्याला अर्थ नाही. हे एवढं टाइम्सच्या बातमीत आहे. माझ्या लक्षात आलेले आणखी दोन प्रसंग आहेत. त्यातली एक तर खूप मोठी घडामोड आहे. गेल्याच महिन्यात अमिताभनं आपली काही संपत्ती श्वेता नंदाच्या नावानं केलीय. म्हणजे बच्चनची संपत्ती वारसा हक्कानं एकट्या अभिषेकची नसणार हे अमिताभनं याद्वारे स्पष्ट केलंय.

दुसरी म्हणजे काल परवा मी एक केबीसीचा एपिसोड पाहिला. त्यात एका स्पर्धकानं तुम्ही आराध्यासोबत कधी वेळ घालवता असा प्रश्न केला होता. त्यावर अमिताभनं आमची गाठभेटच होत नाही. मी सकाळी ७ ला घराबाहेर पडतो, ती ८ वाजता शाळेला जाते, ४ वाजता घरी येते...मी रात्री ११ ला वगैरे जातो तोपर्यंत आराध्या झोपी गेलेली असते. कधी कधी घरी असलो तरी ती गृहपाठात बिझी असते, त्यामुळं रविवार किंवा सुट्टीच्या दिवशीच भेट झाली तर झाली. हां पण फोनद्वारे आम्ही टचमध्ये असतो. अभिनयाचा बादशहा हे बोलत असताना आतून कुढत होता हे लपलं नाही.

...हे सगळं खरं असेल तर दुःखद आहे.आणि मी खात्रीनं सांगतो, कारण एकदम क्षुल्लक आणि क्षुल्लक असणार आहे. एकमेकांचा विशेषतः बच्चन फॅमिलीतल्या महिला वर्गाचा अहंकार आणि एकमेकांप्रती प्रेम,जिव्हाळा,आदर नसणं, एकमेकांना वेळ देता न येणं असलंच काही तरी असणार. कारण बच्चन लोकांना पैशाला काही कमी नाही. ऐश्वर्यानं चित्रपटात काम करण्याला कोणत्याही बच्चनचा विरोध नाही. सगळे सुशिक्षीत आणि आपल्या कुटुंबाचा आब ओळखून आहेत. त्यामुळं स्वतः बच्चननं अजून थोडा पुढाकार घेऊन घर एक ठेवावं. अजून थोडा म्हणण्याचं कारण म्हणजे अमिताभनं यापूर्वी नक्कीच प्रयत्न केले असणार. बच्चन कुटुंबाबद्दल जिव्हाळा असलेले अनेक बडे-बडे लोक आहेत. अगदी मुकेश अंबानींपासून ते सचिन, पवार, ठाकरे,मोदींपर्यंत.अभिषेक स्वतः प्रचंड सभ्य आणि संस्कारी आहे आणि त्याचेही अनेक चांगले मित्र आहेत. कुणी तरी पुढाकार घ्यावा आणि हो जोडी अबाधित ठेवावी. तुटायला काय लागतंय ? एकत्र राहायला त्याग लागतो.रितेश आणि जेनेलियाकडं बघा, किती हसत-खेळत, मौज-मजा करत राहतात. एकमेकांची जाहीरपणे खेचत राहतात, पण कुठेही अनादर नाही. विराट-अनुष्कासुद्धा बघा, प्रेम किती ओसंडून जातंय...शाहरुख-गौरी तर नात्याला किती महत्व देऊन राहतायत. अजय देवगण-काजोल तर दोन ध्रुवावर दोघे आपण थाटाचे आहे, पण एकमेकांचं काही आवडत नसलं तरी ते स्विकारुन एकत्र राहतायतच की ! रणबीर-दीपिकाकडेही अभिषेक-ऐश्वर्यानं बघावं. बाहेरचं कशाला, अमिताभ आणि जया बच्चनही खुशी-नाखुशीनं संसार रेटतच आलेयत की. उलट उत्तरोत्तर जुनं विसरुन जरबेनं म्हणा किंवा आनंदानं म्हणा एकत्रच राहिलेयत. त्यामुळं अभिषेक-ऐश्वर्यानं आमीर खान, ऋतिक रोशन, अरबाज,सैफ अलीच्या वाटेनं जाऊ नये.

आधीच अभिषेकचं करिश्मा कपूरसोबत साखरपुडा झाल्यानंतर लग्न मोडलेलं आहे. त्यानंतर दीपिका आणि राणी मुखर्जीसोबत लग्न करेल अशा चर्चा रंगल्या होत्या आणि या दोघीही बच्चन परिवाराच्या जवळ गेल्या होत्या. पण शेवटी ऐश्वर्यासोबत बोहल्यावर चढला. लग्नाला१५-१६ वर्ष तर झालेयत येड्यांनो ! ■■

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)